
पुणे, किशोर– वर्ष ५२, अंक ५ वा, मे २०२३, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 52, Issue- 5, May 2023 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

मे २०२३





# कशी असते सुट्टी?

डॉ. अनुजा जोशी

आंबा आणि काजू
जांभळं आणि गरे
कसे लागतात झाडावरती दाखवा तरी बरे ?

कैऱ्या आणि चिंचा
चिकणं आणि बोरं
दगड मारून कशी पाडतात हुशार हुशार पोरं

घुंगरू आणि दोरी
बैल आणि गाडी
कशी पळते रस्त्यावरून बैलांची जोडी?

अभ्यासाला बुट्टी
मौजमजेशी गट्टी
कशी असते दाखवा तरी उन्हाळ्याची सुट्टी?

आई म्हणते जाऊ
बाबा म्हणतात पाहू
आजी आबा, आम्ही कधी गावाकडे येऊ?

संपर्क : ७७२१८१०९८६

# किशोर

मे २०२३, वर्ष ५२ वे, अंक ५ वा, वैशाख-ज्येष्ठ, शके १९४५







**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर

अक्षरजुळणी : किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

वितरण व्यवस्थापक
जालिंदर पाटील

मुखपृष्ठ : अन्वर हुसेन
संपर्क : ९८५०९६५३८३

चित्रांकन : चारूहास पंडित, श्रीनिवास प्रभुदेसाई, घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे, माईंडइट संवाद, जैत्र डिजिटल, अमृता ढगे, अक्षदा जोशी, मना हाल, गणेश ढवळे, निकिता वैद्य


## अंतरंग


- कशी असते सुट्टी? ..... *डॉ. अनुजा जोशी* ..... ०२
- चिव चिव चिव... जीव लावा जीव ..... *मनोहर भोसले* ..... ०६
- जय जय महाराष्ट्र देशा ..... *राम पांचाळ* ..... ११
- रामभरोसे बढाईखोर ..... *श्रीकांत बोजेवार* ..... १२
- ओळख ..... *सती भावे- हाल* ..... १६
- 'ग'ची गंमत ..... *श्रीनिवास प्रभुदेसाई* ..... २०
- म्हणून तुझे तूच शिकायला जा! ..... *डॉ. रुपेश पाटकर* ..... २१
- लपाछपी ..... *उत्तम सदाकाळ* ..... २२
- ढाणू गाढव ..... *किरण येले* ..... २६
- गंमत खेळ ..... *राजीव तांबे* ..... २८
- बंधुत्वाचे मंदिर ..... *मनोज बोरगावकर* ..... ३०
- फुलपाखरू ..... *प्रशांत असनारे* ..... ३३
- शोध गुप्त खजिन्याचा... ..... *अभिजित पेंढारकर* ..... ३४
- आंबा! ..... *चारुता प्रभुदेसाई* ..... ३७
- कुतूहल. ..... *अमित डहाणे* ..... ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ ..... ४०
- उमलती प्रतिभा ..... ४२
- चित्रकथा : पाठलाग ..... *घनश्याम देशमुख* ..... ४४
- लंडनवारी ..... *मुबारक शेख* ..... ४६

**ENGLISH SECTION**

- Papa's shoes ..... *Dr Rasika Thosar* ..... ४७
- The sky is clear now ..... *Varsha Dhoke* ..... ४८
- Funny Puzzle ..... *Ghanshyam Deshmukh* ..... ५०










ऑनलाइन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.



**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७ वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४ ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

## प्रिय किशोर

किशोरने लावली
वाचनाची गोडी
बुद्धीला चालना देतात
चित्रांची कोडी..

अंतरंग बाह्यरंग
फारच छान
म्हणूनच खुलते
पान अन् पान..

रंगीबेरंगी चित्रावली
मोहून टाकते मनाला
वाचनाची उत्सुकता
वाढते पानापानाला..

गाणी आणि गोष्टींचा
किशोर अस्सल दागिना
बालचमूंना मिळाला
मनोरंजनाचा खजिना..

अचूक शोधते उत्तर
कुतूहलाची प्रश्नावली
भावी आधारस्तंभ
लेखनास सरसावली..

किशोर आपला
लय लय भारी
आनंदूनी जाते
बालचमूंची स्वारी..

अलका रसाळ
संपर्क : ७५८८०३२७६९९





# एका सुट्टीची (हवीहवीशी) गोष्ट...

हितगुज

किशोर मित्र मैत्रिणींनो,

"सुट्टी" हा तुमच्यासह आई,बाबा, काका, मामा आणि इतर सर्व मोठाल्या मंडळींचा जिव्हाळ्याचा विषय नाही का ? रोजचे धकाधकीचे जीवन, कष्ट यातून थोडीशी सुटका व्हावी, थोडा आराम मिळावा या हेतूने आपल्या देशात सुट्टी सुरू झाली. थोर समाजसुधारक नारायण मेधाजी लोखंडे यांनी आठवड्यातील सातही दिवस काबाडकष्ट करणाऱ्या कामगारांच्या साप्ताहिक सुट्टीकरिता इंग्रज सरकारसोबत लढा दिला. त्यातून १० जून १८९० पासून रविवार हा दिवस साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर करण्यात आला. तुम्हां बच्चे कंपनीकरिता प्रत्येक उन्हाळ्याची सुट्टी नेहमीच नवीकोरी, करकरीत असते. तुमच्यापैकी प्रत्येकाची सुट्टी खास असते. या सुट्टीला स्वतःचा नवा गंध, सुगंध, रंग, नाद आणि अतूट ऋणानुबंध असतोच असतो. तिची चव उन्हाळ्यातील रानमेव्याप्रमाणे जिभेवर रेंगाळत राहणारी असते. तिचा सुगंध वसंत ऋतूत फुलणाऱ्या फुलांप्रमाणे मनभर दरवळणारा, हवाहवासा वाटणारा असतो. सुट्टी म्हणजे एखाद्या कुपीत जपून ठेवलेले अत्तरच जणू ! किंवा रानात अचानक गवसलेले रंगीत मोरपीस जे तुम्ही तुमच्या आवडत्या पुस्तकात किंवा वहीत जीवापाड जपून ठेवलेले असते. सुट्टी म्हणजे आठवणींचा खजिनाच...

तुम्ही परीक्षेचा शेवटचा पेपर देऊन आलात की सुट्टीचा माहोल खऱ्या अर्थाने सुरू होतो. पण परीक्षा संपण्याच्या आधीपासूनच तुमचे सुट्टीचे जोरदार प्लॅनिंग सुरू झालेले असते. परीक्षेच्या दिवसात अभ्यास करताना हातात पुस्तक धरल्यानंतर येणारी झोप एकदा सुट्ट्या लागल्या की अचानक गायब होऊन जाते ना ? अगदी भरदुपारी आमरस खाल्ल्यानंतरही... एकदम गुप्तच होते की... एखाद्या गोष्टीतील जादूगारासारखी.. खरंच सुट्टी म्हणजे जादूच असते... सुट्टी म्हणजे धम्माल खेळणे, बागडणे, धिंगाणा.. सुट्टी म्हणजे कैऱ्या, पेरू, आवळे, चिंचा, कलिंगड, फणस, करवंद, जांभळं, चिकू, ऊस, काकडी, टोमॅटो आणि आंबे.. सुट्टी म्हणजे सूरपारंब्या, लपाछपी, भातुकली, गोट्या, सागरगोटे, बांगड्या, बाहुल्या, चिंचोके, विटीदांडू, पत्ते, कॅरम, पुठ्ठ्यांचे नि पत्त्यांचे बंगले आणि क्रिकेट..सुट्टी म्हणजे रोज दुपारी गारेगार, कुल्फी आणि उन्हात वाळत टाकलेले सांडगे, पापड, कुरडया खाणे.. सुट्टी म्हणजे वाचन. सुट्टी म्हणजे गोष्टी...

उन्हाळ्याच्या सुरुवातीला वसंत ऋतूमध्ये झाडांना पालवी फुटते. ती पाहण्यात, न्याहाळण्यात असीम आनंद असतो. तो तुम्ही जरूर घ्या. झाडांची, वनस्पतींची, पक्ष्यांची नावे माहीत करून घ्या. या सुट्टीत निसर्गालाच तुमची शाळा आणि गुरू करा. या शाळेत आणि निसर्ग नावाच्या शिक्षकाबरोबर मस्त मजा करा. सुट्टीचा उपयोग तुम्ही नवनवीन काहीतरी उत्तम शिकण्यासाठी नक्कीच करू शकता. तुमचा वेळ, ऊर्जा या कामी लावून अधिक चांगली कौशल्ये प्राप्त करू शकता. याचा तुम्हांला भविष्यात अधिक फायदा होऊ शकतो. उदा. तुम्ही एखादी नवी भाषा शिकू शकता. तसेच तुम्ही उत्तम वाचन व तयारी करून मराठी, हिंदी, इंग्रजी या तुम्हांला शाळेत शिकवल्या जाणाऱ्या भाषा अधिक चांगल्या सुधारू शकता. गणित–विज्ञानाची मनोरंजक माहिती मिळवू शकता. भाषा शिकण्यात खूप मौजमजा आहे. एक छान गंमत आहे. त्याचा सुंदर अनुभव आपण घेऊ शकता. उरलेल्या वेळात आपल्या आजूबाजूच्या परिसरात पाणी बचतीचे महत्त्व पटवून देऊ शकता. तहानलेल्या लोकांसाठी स्वच्छ व थंडगार पाण्याची व्यवस्था करू शकता. चांगली रोपे मिळवून वृक्षारोपण करू शकता. या सुट्टीचा वापर इतरांना आनंद देण्यात, आनंद पसरवण्यात करा. उदा. तुमच्या जवळच्या परिसरातील एखाद्या अनाथाश्रमात, वृद्धाश्रमात स्वयंसेवक म्हणून तुम्ही काम करू शकता. लहानग्यांना खेळ, गाणी, नाच, भाषण शिकवू शकता. वाहतुकीचे नियम लोकांना पटवून देऊ शकता. गावासाठी श्रमदान करू शकता. आपले घर, आपला परिसर, शाळा, गाव, स्वच्छ करू शकता. या सुट्टीत अशी एक ना अनेक कामे तुम्ही मनापासून करून तर पहा.. त्यातून किती समाधान मिळते हे अनुभवून तर पहा दोस्तांनो... प्रत्येक सुट्टी संपताना एक हुरहूर, हळहळ वाटते. सुट्टीरूपी नाजूक, रंगीबेरंगी मोरपिसाचा रोज होणारा मुलायम, मखमली स्पर्श आता दुरावणार याची हळुवार जाणीव होते आणि नेमक्या याच वेळी आभाळ भरून येते आणि वळिवाचा वादळी पाऊस पडतो. येणाऱ्या पावसाळ्याची जणू चाहूलच... अशी असते एका सुट्टीची हवीहवीशी गोष्ट..



**किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक



मनोहर भोसले

# चिव चिव चिव... जीव लावा जीव

जीतू मनमिळावू स्वभावाचा होता. त्याचे अनेक मित्र होते. त्यांच्याबरोबरच तो शाळेला जायचा, खेळायचा; अभ्यास करायचा.

गेल्या काही दिवसांपासून त्याचं मित्रांत मिसळणं कमी झालं होतं. ऑनलाईन अभ्यासाच्या नावाखाली मोबाईल घेऊन तो एकटाच टेरेसवर जाऊन बसत होता. आई दिवसभर घरकामात व्यस्त असायची. बाबा सकाळी लवकर कामावर जायचे. यामुळे जीतू काय करतो आहे याकडे कुणाचंच लक्ष नसायचं.

एके दिवशी जीतूच्या आई धान्य आणायला

दुकानात गेल्या. दुकानदार म्हणाला.

"काय वहिनी..जीतू कुठे आहे?"

"आहे की घरी."

"आला नाही काल आमच्याकडे."

"का? कशाला?" आईने प्रश्न विचारला तसा दुकानदार म्हणाला,

"अहो कशाला म्हणजे काय.. धान्य न्यायला?"

"मी आले आहे ना ?" जीतूच्या आई जरा रागातच बोलल्या. तसा तो म्हणाला,

"काही हरकत नाही. तुम्ही घेऊन जा."

दुकानदार असं का बोलला हे काही जीतूच्या आईला कळलं नाही. आपली पिशवी समोर ठेवून त्या पाकिटामधून पैसे काढू लागल्या. एवढ्यात दुकानदाराने केरसुणी घेऊन झाडून काढलं आणि कोपऱ्यात गोळा झालेले धान्य एक पुडीत बांधले आणि म्हणाला.

"हे घ्या."

"हे काय ?"

"अहो गोळा केलेलं धान्य आहे"

"शी SSS. गोळा केलेलं? आम्ही काय असलं खातो का?"

"अहो असं काय करता? तुमचा जीतू दररोज शाळेतून घरी जाताना आमच्याकडे येत असतो."

"काय?" पुन्हा जीतूच्या आईची संभ्रमावस्था झाली.

दुकानदार म्हणाला,

"गहू, तांदूळ गिऱ्हायकाला देताना अथवा पोत्यामधून घेताना सांडलेले दाणे असतात ते जीतू स्वत: झाडू मारून गोळा करतो आणि घेऊन जात असतो."

"असं?"

"फार कष्टाळू आहे ओ तुमचा मुलगा.."

"अहो पण आम्हांला हे सांडलेलं नको आहे. चांगले तांदूळ द्या."

खरंतर आईला जीतूचाच राग आला होता पण, त्या दुकानदारावरच खवळल्या. दुकानदाराने गुपचूप पुडी बाजूला ठेवली आणि शांतपणे चांगले तांदूळ वजन करून दिले. त्याचे पैसेही घेतले. हा सगळा घडलेला प्रकार घरी आल्यानंतर जीतूच्या बाबांना समजला.

रविवार होता. जीतूच्या शाळेलाही सुट्टी होती आणि बाबांच्या ऑफिसलाही. जीतू दप्तर घेऊन अभ्यासासाठी टेरेसवर निघाला होता. एवढ्यात आईने त्याला हाक मारली.

"जीतू कुठे निघालास?"

"अभ्यासाला टेरेसवर."

"टेरेसवर-बेरेसवर काही जायचं नाही. इथंच बस अभ्यास करत."

"टेरेसवर का नको?"

"नको म्हटलंय ना एकदा?" आईने जरा करड्या आवाजात दरडावलं. तो नाराज झाला. बाबा म्हणाले,

"तू टेरेसवर जाऊन एकटाच बसतोस. तासन तास मोबाईलवर असतोस. कसला अभ्यास करतोस हे आम्हांलाही जरा कळू दे."

"अभ्यासाच्या नावाखाली अनेक मुलं आता गेम खेळत असतात. युट्यूबवर व्हिडीओ, फोटो पाहात बसतात."

"हे खरं असलं तरी मी तसं काहीही करत नाही हं आई.."

".. .. ..?" जीतूच्या या उत्तरावर आईही काही बोलली नाही आणि बाबाही बोलले नाहीत.

तो पुढे म्हणाला,

"आणि मी एकटा नसतो बरं का टेरेसवर. माझे जिवलग मित्रही असतात."

"जिवलग मित्र, कोण जिवलग?"

"बघायचं आहे का तुम्हांला? चला मग टेरेसवर."

जिन्याची एकेक पायरी चढत तिघेही वर गेले. जिन्याचा दरवाजा उघडल्याबरोबर चिव चिव करत बसलेल्या अनेक चिमण्या बघून आई आणि बाबांना आश्चर्य वाटलं. जीतूने आपल्या दप्तरामधून पाण्याची बाटली आणि बांधलेली पुडी बाहेर काढली. समोर ठेवलेल्या वाटीत बाटलीमधलं पाणी ओतलं. पुडी सोडून तांदूळ पसरले तशा सगळ्या चिमण्या त्यावर तुटून पडल्या. तळहातावर दोन चार दाणे घेऊन जीतूने हात समोर केला तशी एक लंगडी चिमणी तळहातावर येऊन बसली. त्यानं तिच्या अंगावरून हळुवार हात फिरवला. म्हणाला,

"बाबा, ही बघा लंगडी. काही दिवसांपूर्वी इथंच आपल्या टेरेसवर तडफडत पडली होती. मी तिला पाणी पाजलं होतं."

"छान छान" बाबांना आनंद वाटला. जीतू पुढे म्हणाला,

"पाणी पिऊन ही चिमणी तरतरीत झाली आणि उडून गेली. दुसऱ्या दिवशी पुन्हा आली."

"आणि मग?"

"मी तिला आपल्या घरातले चिमूटभर तांदूळ खायला दिले होते. आज हिच्या पाठोपाठ या किती चिमण्या आल्या आहेत बघा."

"अरे वाह ..!" असं म्हणत जीतूचे बाबा हळूच जीतू जवळ गेले. त्याच्या हातावर बसलेल्या चिमणीकडे मोठ्या कौतुकाने पाहू लागले. जीतू म्हणाला,

"या चिमण्या, आता दररोज या वेळी माझी वाट बघत बसलेल्या असतात."

हे सगळं दृश्य पहाणाऱ्या आईच्याही चेहऱ्यावर प्रचंड आनंद दिसत होता. चिमुरड्या जीतूचं बोलणं ऐकताना तिच्या अंगावर शहारे येत होते. जीतू म्हणाला,

"आता एवढ्या सगळ्या चिमण्यांना ओंजळभर धान्य लागतं. आई, तू रागावशील म्हणून मी घरातले तांदूळ घेत नाही. धान्याच्या दुकानात पडलेले गोळा करून आणतो. आणि असेही हे दुकानदार कचऱ्यातच ढकलून देत असतात."

जवळच तोंड उघडून पंख फडफडणाऱ्या दोन पिलांच्या चोचीत घास भरवणाऱ्या एका चिमणीला पाहून जीतूची आई गलबलून गेली. त्यात जीतू म्हणाला,

"या बिचाऱ्या चिमण्याचं या जगात आहे तरी कोण?"

त्याचे हे शब्द ऐकताच आईचे डोळे डबडबले. नकळत अश्रूंचे एक दोन थेंब टपकले. अगदी मायेने जीतूच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली,

"किती शहाणं गं माझं बाळं.. कुठं शिकलास रे हे सगळं?"

जीतू म्हणाला,

"आमचे गुरुजी म्हणतात.. या चिमण्याची संख्या हळूहळू कमी होऊ लागली आहे. मोबाईलच्या टॉवरमधून हवेत पसरणारे तरंग याला कारणीभूत आहेत म्हणे."

आई आणि बाबा कौतुकाने ऐकत होते. जीतू बोलत होता.



"तुम्हांला माहीत का बाबा.. प्रत्येक पक्षांची वेगवेगळी घरटी असतात? या चिमण्या मात्र घराच्या भिंतीमधल्या खपाटीत किंवा कौलाच्या सांदीमध्ये आपलं घरटं करतात. आता आपली घरं स्लॅबची झाली आहेत यामुळे यांना आसरा मिळेनासा झाला आहे."

"हूंSs" करत बाबांनी सहमती दर्शवली तसा तो कौतुकाने बाबांना म्हणाला,

"मी आपल्या जिन्याच्या कोपऱ्यात एक खोकं अडकवलं आहे. त्यात एका चिमणीने अंडी घातली आहे."

बाबांनी घाईगडबडीत जिन्याकडे धाव घेतली. मान उंच करून खोक्यात डोकावलं,

"अरे खरंच की.."

थोडं खळखळून हसत म्हणाले,

"कमाल आहे बुवा तुझी."

"बाबा, आपण त्या खोक्यामध्ये चिमणीला कैद करून ठेवलेलं नाही. ती स्वत: त्यामध्ये जाते आणि स्वत: बाहेर येते."

"खरं आहे. पक्ष्यांना पिंजऱ्यात कोंडून ठेवणं हा अन्यायच असतो."

या दोघांचं बोलणं सुरू होतं एवढ्यात जीतूच्या आईने तांदळाचे दोन चार दाणे आपल्या तळहातावर घेतले आणि हात पुढे केला. पण, एकही चिमणी

जवळ आली नाही. हात पुढे पुढे करावा तसतशा चिमण्या चिव चिव करत मागे सरकत होत्या. जीतू गमतीने म्हणाला,

"आई, या चिमण्या तुला काय म्हणायला लागल्या आहेत माहीत आहे का ?"

"काय बरं ?"

"चिव चिव चिव. जीव लावा जीव."

आई हसू लागली. जीतू म्हणाला,

"तू रोज दाणे टाकायला लागलीस ना आई.. मग तुला त्या ओळखतील. तुझ्यापासून काहीही धोका नाही हे कळल्यावर हातावर येऊन बसतील."

"खरंच ?"

"हो अगदी खरं."

"मग मी रोज यांना खाऊ घालीन. जीव लावीन." जीतूच्या आईच्या या बोलण्यावर बाबा म्हणाले,

"एवढंच नाही. आपण प्रत्येकाला जीव लावायला सांगू."


"उद्या शाळेत गेल्यावर गुरुजींना आणि मुलांना सांग. त्यांना या चिमण्या पाहायला घरी बोलाव. तुम्हां सगळ्यांसाठी मी खाऊ बनवते."

जीतूचा हा उपक्रम शाळेत चर्चेचा विषय बनला. परिसर भेट या उपक्रमांतर्गत शाळेची छोटीशी सहल टेरेसवर आली आणि चिमण्यांच्याबरोबर मुलांनीही किलबिलाट केला. चिव चिव चिव.

**संपर्क : ९७६७०४४५०९**

---


## एप्रिल २०२३ अंकातील गणिताचा गमतीदार मॉर्निंग वॉक कोड्याचे उत्तर




---

# चिंटू

चारूहास पंडित/ प्रभाकर वाडेकर



# जय जय महाराष्ट्र देशा

■ राम पांचाळ

मनी सजू दे आज
माय मराठीचे राज
जय जय साधूसंत देशा,
नभी गर्जू दे नाद
मनी घुमू दे साद
जय जय महाराष्ट्र देशा...।।धृ।।

अनंत जीवन फुलवत वाहे
कृष्णा–तापी–गोदावरी,
गड धुरंधर मिरवत आहे
स्वराज्य रक्षक सह्यगिरी,
उद्वेग शौर्याचा चेतवित आहे
गडगडल्या ह्या दाहीदिशा..।।१।।

नयन मनोहर लावण्य पाहाया
नक्षी पैठणी नऊवारी,
अभंग भजने प्रेरित राहाया
ज्ञानोबा–तुकोबा–वारकरी,
जयघोष विठूचा होत आहे
गजबजल्या ह्या दिननिशा..।।२।।

माय लेकही शिकत आहे
ज्योती–सावित्रीची ललकारी,
दीनदलितांना उंचावत आहे
शाहू–भीमरावांची वाणी,
जल्लोष समतेचा फुलवित आहे
गुणगुणल्या ह्या यज्ञकुशा...।।३।।

संपदा इथली वाढवित आहे
श्रमिक–कष्टाळू–शेतकरी,
मातीशी ममता जोडीत आहे
जवान प्राण अर्पण करी
सन्मान कीर्तीचा भूषवित आहे
उजळल्या ह्या भाग्यरेषा..।।४।।
जय जय महाराष्ट्र देशा....



संपर्क : ७९७२६७९७६०

श्रीकांत बोजेवार

भाग – ५



# रामभरोसे बढाईखोर

रामभरोसेनं अंघोळ केली, दही–भाकरीची न्याहारी केली आणि तो पारावर जाण्यासाठी बाहेर पडू लागला, तेवढ्यात त्याच्या आईनं त्याला थांबवलं. त्याला देवघरात घेऊन गेली आणि म्हणाली, "राम्या, जरा देवापुढं दिवा लाव आणि शपथ घे– देवा, माझ्याकडे ज्या लोकांच्या भानगडी आणि तंटे येतील तेवढ्याच मी सोडवेन. इतरांच्या भानगडीत, नाक, कान खुपसणार नाही आणि जीभही सैल सोडणार नाही." आपल्या स्वभावामुळे चांगलाच पोळलेला राम्या आईच्या आज्ञेनुसार देवापुढे बसला, दिवा लावला आणि हात जोडून त्यानं शपथ घेतली. आईनं त्याच्या कपाळावर अंगारा लावला आणि म्हणाली, "माझं गुणाचं लेकरू."

राम्या बाहेर पडला आणि इकडेतिकडे कुठेही न

# बेभरवशा रामभरोसे



पाहता, सरळ नाकाच्या दिशेनं चालत जाऊ लागला. "राम्या, आरं जरा बघ की आमच्याकडे" असं म्हणत काही टारगट पोरांनी त्याला छेडण्याचा प्रयत्नही केला, पण राम्यानं कुणाला दाद दिली नाही. त्याचा नेहमीचा पार समोर दिसू लागला आणि तंटा घेऊन आलेली चार माणसंही दिसू लागली तेव्हा त्याला बरं वाटलं. "आपण कोणाशीही काहीही न बोलता आपल्या नोकरीच्या ठिकाणापर्यंत पोहोचलो", याचा त्याला आनंद झाला. त्यानं पारावरची आपली जागा घेतली आणि समोर उभ्या असलेल्या बालाजीला म्हणाला, "काय रे बालाजी, कोणाशी तंटा केलास?" बालाजी काही बोलणार तेवढ्यात नदीच्या काठाला वस्ती केलेल्या शंभूची लेक बायजा समोर आली आणि म्हणाली, "यानं रातीला माज्या शेतातली पोतंभर वांगी तोडली रं राम्या आन् सकाळी बाजारात नेऊन इकली."

बायजाचा दावा असा होता की गावात हिरवी वांगी फक्त तिच्याच शेतात आहेत, त्यामुळे बालाजीनं विकलेली पोतभर हिरवी वांगी तिच्याच शेतातली आहेत. तर बालाजीचं म्हणणं होतं की त्यानं शेजारच्या खेड्यातून पोतभर हिरवी वांगी विकत आणली होती. रामभरोसेनं दोघांचंही म्हणणं ऐकून घेतलं आणि बालाजीला म्हणाला, "बालाजी, तू असं कर, ज्याच्याकडून तू हिरवी वांगी विकत घेतलीस ना, त्याला घेऊन ये पारावर. त्यानं जर तुला वांगी विकल्याचं कबूल केलं तर मग प्रश्नच मिटला." हा तोडगा दोघांनीही मान्य केल्यावर रामभरोसे पुढच्या तंट्याकडे वळला.

दुपारी जेवायला घरी निघाला तेव्हा रामभरोसे खूप समाधानी होता. आपण आता आपल्या स्वभावातील दोषांवर नियंत्रण मिळवलं असा विश्वास त्याला वाटू लागला. तो स्वतःवरच खूश झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी रामभरोसे पारावर आला तेव्हा बायजा तिथं आधीच हजर झालेली होती, बालाजीचा मात्र पत्ता नव्हता. बायजा रामभरोसेला म्हणाली, "बघ, मी म्हटलं होतं ना, ती वांगी त्यानं चोरलीच होती, तू आता राजाकडे तसा अहवाल पाठवून दे, म्हणजे बालाजीला शिक्षा होईल चोरी केल्याबद्दल." रामभरोसेनं अहवाल लिहिण्याची तयारी सुरू केली तेवढ्यात बालाजी धावत पळत आला आणि म्हणाला, "राम्या, आरं मी ज्याच्याकडून वांगी विकत घेतली होती, तो दुसऱ्या गावाला गेला हाय एका कामासाठी."

रामभरोसेनं त्याला विचारलं, "कधी परत येणार आहे तो?"

बालाजी म्हणाला, "मला काय ठाव न्हाय."

बायजानं आपलाच हेका सुरू ठेवला. "हा खोटा बोलतोय, यानं वांगी चोरलीच होती." तर बालाजी म्हणत होता, "आरं राम्या. न्हाय चोरली मी वांगी." रामभरोसे विचारात पडला आणि अचानक त्याचे डोळे लकाकले. तो म्हणाला, "बायजे, मला तुझ्या शेतातली हिरवी वांगी बघायची आहेत." आता मात्र बायजा सटपटली आणि म्हणाली, "वांगी तर समदी नेली की यानं तोडून."



"बरं, पण झाडं असतील ना, ती तरी दाखव मला."

"आरं, वांगी काढून नेली, मग झाडं कशाला ठेवायची? मी उपटून फेकून दिली." "का? आणखी वांगी लागली असती की झाडांना त्या."

बायजाकडे याचं काही उत्तर नव्हतं. आता बालाजीला जोर चढला. तो म्हणाला, "राम्या, बरोबर पकडलं बघ हिला तू. आता मला कळलं समदं. हिनं मला लग्नाला मागणी घातली होती. मी तिला नकार दिला म्हणून माज्यावर चोरीचा आळ आणला हिनं. पर तू लय हुशार, तुज्यामुळे हिचं नाटक उगडं पडलं बघ."

बायजाच्या आजूबाजूला ज्यांची शेतं होती, त्यांना बोलावून राम्यानं चौकशी केली, तेव्हा सगळं उघड झालं. तिच्या शेतात हिरवी वांगी नव्हतीच लावलेली. रामभरोसेनं निवाडा दिला, "बालाजी निर्दोष आहे." बायजानं केलेला खोटेपणाही त्यानं राजाच्या दरबारी कळवला. राजानं रामभरोसेला कौतुकाचा खलिता पाठवला.

त्या रात्री रामभरोसेला स्वप्न पडलं की आपली नियुक्ती राजानं मुख्य न्यायाधीश म्हणून केली आहे. त्याला त्या स्वप्नानं जाग आली आणि तो स्वतःशीच म्हणाला, 'नक्कीच हे स्वप्न खरं होणार, आपल्यापेक्षा जास्त लायक माणूस कोणी असूच शकत नाही या पदासाठी.'

सकाळी उठून नेहमीप्रमाणे तो न्याहारी करून निघाला तेव्हा रस्त्यात त्याला बाळा सुतार भेटला. रामभरोसे त्याला पाहून थांबला आणि म्हणाला, “मी रोज पारावर बसून निवाडे देतो. आता माझी नियुक्ती राजाचा मुख्य न्यायाधीश म्हणून होणार आहे. मला पारावर बसणं आता बरं वाटत नाही. माझ्यासाठी एक छान नक्षीदार खुर्ची बनवून दे.”

रामभरोसे दिवसभर त्याच तोऱ्यात होता. पारावर आलेल्या प्रत्येकाला तो बायजा आणि बालाजीचा निवाडा थोडा थोडा मसाला घालून सांगत होता. आधी फक्त स्वतःचं कौतुकच सांगत होता, मग हळूहळू बढाया मारू लागला. दुपारी संपत सावकार आले, तर त्यांना म्हणाला, “तुम्हांला सांगतो, काल काय झालं ते. त्या बायजानं माझे पाय धरले, मला म्हणाली; तुला दोन पोती गहू देते, पण माझ्या बाजूनं निवाडा दे. मी तिला म्हटलं. छट्, रामभरोसे नाव आहे माझं, मला लाच देतेस का तू?”

संध्याकाळ होता होता, त्याचं बढाया मारणं वाढत गेलं आणि बढाईची किंमतही वाढत गेली. रात्री रामभरोसे घरी निघता निघता गावचे गुरुजी फेरफटका मारत तिथं आले आणि त्याच्या निवाड्याचं कौतुक करू लागले. तेंव्हा जास्तच शेफारून तो त्यांना म्हणाला, “गुरुजी तुम्हांला माहिती आहे का, बायजा मला म्हणाली, तुला दोन सुवर्णमुद्रा देते, माझ्या बाजूनं निवाडा दे. मी म्हटलं समजलीस काय मला तू, रामभरोसे नाव आहे माझं, मला लाच देतेस का तू?”

सुवर्णमुद्रांचा मोह टाळून रामभरोसे सत्याच्या बाजूनं उभा राहिला आणि त्यानं योग्य निवाडा दिला म्हणून गुरुजींनी त्याला शाबासकी दिली. तेव्हा रामभरोसे त्यांच्या कानात हळूच म्हणाला, “गुरुजी, एक गुपित सांगतो तुम्हांला, माझ्या नावाची चर्चा सुरू आहे राजदरबारात, मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करणार आहेत म्हणे माझी.”

दिवसभर तंटे सोडवण्यापेक्षा स्वतःचं कौतुक सांगण्यातच तो रमू लागला होता. काही तंटेकरी आले तेव्हा त्यांना त्यानं “तुम्ही उद्या या, आज मी फार कामात आहे”, असं सांगून पिटाळून लावलं. घरी परतताना तो बाळा सुताराकडे गेला आणि त्यानं खुर्ची करायला घेतली की नाही याची चौकशी केली. बाळा सुतारानं विचारलं, “मी खुर्ची तर घेतली आहे करायला, पण त्याचे पैसे कोण देणार आहे?”

रामभरोसे म्हणाला, “मूर्ख आहेस का लेका तू? राजदरबाराचं काम आहे हे, त्याचे पैसे मागतोस तू? खरं तर आपल्या ओळखीच्या माणसाला एवढा मोठा मान मिळतो आहे म्हटल्यावर पैशाचा विचारही तुझ्या डोक्यात यायला नको होता.”

बाळा सुताराकडून निघून रमतगमत रामभरोसे घराकडे निघाला. त्याला एक कविताही स्फुरली–

‘बायजाच्या शेतात नव्हती हिरवी वांगी
रामभरोसेनं कशी ठेचली तिची नांगी
बालाजीला झाला बघा आनंद फार
रामभरोसे आपला भलताच हुश्शार’

ही कविता स्वतःशीच गुणगुणत तो घरी गेला. घरी गेल्यावर तो हातपाय धुऊन जेवायला बसला, तर त्याची आई त्याच्याकडे पाहत म्हणाली, “पडला बिडलास का रे येताना, तुझं डोकं थोडं सुजल्यासारखं वाटतं.”

“तुझं आपलं काहीतरीच आई. डोकं कुठं सुजत असतं का? काहीही बोलतेस तू.”

सकाळी जाता जाता बाळा सुताराकडून खुर्ची घेऊन जाण्याचं डोक्यात नक्की करून रामभरोसे झोपला. कालचं स्वप्न आज पुन्हा पडावं असं त्याला वाटत होतं, त्यामुळे त्याला झोपायची घाई झाली होती. तोंडावर पांघरूण घेऊन तो लगेचच झोपीही गेला.

**(क्रमशः)**

**संपर्क : ९८९२४१९२६७**




सती भावे- हाल

भाग – २

# ओळख

टॅक्सी निघून गेल्या माझ्या लक्षात आलं की सगळीकडे किती शांत आहे. बापरे इथे फक्त मी, रूचामावशी आणि तिचे बाबा! दोन महिने!

"अनी चल ना, कसला विचार करतोयस?" तीन बॅग्स उचलून पुढे गेलेली रूचामावशी चालता चालता म्हणाली.

मी फोन उघडला. फोनला रेंजच नव्हती. रूचामावशी आणि माझ्यात अंतर पडत चाललंय हे लक्षात आल्यावर मी माझी सॅक पाठीला लावली आणि पटापट चालू लागलो. उंच उंच झाडांमधून चढाची पायवाट होती. समोर झाडांमध्ये लपलेलं लाकडी घर डोकावायला लागलं होतं.

"रूचामावशी, आई म्हणाली होती की मला इथे आल्यावर एक सरप्राइज मिळणार आहे. ते काय गं?"

"कळेल लवकरच." रूचामावशी हसून म्हणाली. तेवढ्यात पलीकडे झाडांमध्ये काहीतरी सळसळण्याचा आवाज झाला. "रूचामावशी इथे वाघ असतात?"

"वाघरू येतं कधी कधी. पण बहादूर घाबरून खूप भुंकतो."

हे वाक्य पूर्ण होइतो बहादूरचं भुंकणं ऐकू आलं. मी नकळत रूचामावशीचा हात पकडला. एक चित्कार ऐकू आला आणि झाडीतून एक काळी आकृती आमच्याकडे झेपावली. मी ओरडत

घराच्या दिशेने पळालो. मागे हसण्याचा आवाज ऐकू आला तरीही घरी पोहोचेपर्यंत मी मागे वळून बघितलं नाही.

बहादूर माझं स्वागत करायला शेपटी हलवत आला पण दुसरं कुणीच दिसलं नाही. खरोखर अजबघरा समोर भिंतभर फळा होता. छतापासून दोन मोठे दोर लटकले होते. एक जिना होता मध्येच. कुठेच न जाणारा. सतरंज्या होत्या, वेगवेगळ्या आकाराचे बॉक्स होते. एक भिंतभर पुस्तकं होती. एक भिंत स्वयंपाकघराची होती. भिंती वाटतील असे तीन रंगीत चौकोन होते... चाकं लावलेले. घराच्या चारी बाजूनी व्हरांडा होता. असं घर आधी कधीच बघितलं नव्हतं. एका भिंतीच्या मागून एक मांजराचा मुखवटा डोकावला. मी दचकलो. तेवढ्यात मागच्या दारातून डोक्यापासून पायापर्यंत घुबडाचा ड्रेस घातलेला कुणीतरी माणूस उड्या मारल्यासारखा चालत पुढे आला. मी मागे वळून “रूचा मावशी” अशी हाक मारली तर तिच्या मागे काळविटाचा मुखवटा आणि तसा ड्रेस घातलेलं कुणीतरी उभं होतं.

“अरे घाबरू नको अनी. हे घुबड म्हणजे ताओ आजोबा. हे मांजर म्हणजे सारा आणि हे काळवीट म्हणजे भूमी. त्यांचा आज प्राणी व्हायचा दिवस आहे. दिवसभर काही न बोलता प्राणी म्हणून फिरत असतात.”

“हा हा हा हा” घुबडाच्या ड्रेसमधून मोठ्ठा हसण्याचा आवाज आला. ड्रेसचा तंबू हळूच उचलला गेला. आतून पोटापर्यंत पांढरी दाढी असलेले आणि पाठीपर्यंत पांढऱ्या केसांची वेणी घातलेले आजोबा बाहेर आले. मांजराच्या




मुखवट्यामधून एक गोल गालांची चश्मीश, मुलासारखे बारीक केस कापलेली मुलगी बाहेर आली. काळवीटाच्या मागून एक उंच कुरळ्या लांब केसांचा मुलगा बाहेर आला. रुचामावशीने ओळख करून दिली.

“अनी, ही सारा आणि हा भूमी. सारा सहावीत जाणार आहे आणि भूमीने सातवीनंतर शाळा सोडून दिलीये. हे दोघं जण सुद्धा तुझ्याबरोबर इथेच रहाणार आहेत. आणि हेच तुझं सरप्राइज आणि हा अनी, अनिरुद्ध किंवा मनू. अनी, हे ताओ आजोबा. हे माझे बाबा आहेत आणि सारा आणि भूमी माझी मुलं आहेत. आणि तुम्हांला मी फोनवर सांगितलंच आहे. अनी हा माझ्या अगदी जवळच्या मैत्रिणीचा मुलगा. भूमी, अनीला त्याची खोली करायला मदत करशील?”

भूमीने माझ्या पाठीवर थाप मारली आणि दोन चाकवाल्या भिंती लावून पटकन माझ्यासाठी एक छोटी खोली तयार केली.

रूचामावशीने लगेच जेवायला बोलावलं. आईने पाठवलेल्या पुरणपोळ्या, एक कसलीतरी भाज्या



घातलेली खिचडी, हिरव्या रंगाचं सूप आणि पापड अशा जेवणावर सगळे ताव मारत होते. मी फक्त पुरणपोळी खायचं ठरवलं. भाज्या खा म्हणून कुणीच माझ्या मागे लागलं नाही म्हणून बरं वाटलं.

सरांनी मला एकदम प्रश्न विचारला.

"तू कोण आहेस?"

"अनिरुद्ध देशपांडे" मी खुळ्यासारखा हसून म्हणालो.

"मी कोण आहे विचार ना." सारा म्हणाली.

"तू कोण आहेस?" मी या मुलीचा बहुधा स्क्रू ढिला आहे असं वाटून विचारलं.

"मी सूर्य आहे." सारा म्हणाली. मला हसायला आलं.

बघ ना, सूर्यातून पृथ्वी तयार झाली. मग पृथ्वीवर लाइफ तयार झालं. मग माणूस तयार झाला. मग आज्जी आजोबा, मग आईबाबा... मग मी म्हणजे ओरिजनली मुळामध्ये मी कोण आहे? सूर्यच ना? म्हणून मी सूर्य आहे.

"सूर्याच्याही आधी सगळं युनिव्हर्स होतं त्यामुळे आपण सगळेच सूर्यपण आहोत... युनिव्हर्सपण आहोत."

भूमी म्हणाला.

"आपण सगळे युनिव्हर्स आहोत तर आपण इथेच होतो आणि हा पुण्याहून आला. असं कसं?" साराने चिडवत विचारलं.

"माझा हा हात इकडून पापड घेऊन आला आणि हा हात इथे डिशमध्ये भात कालवतोय असं." भूमी म्हणाला.

"रूचामावशी इथे फोनला रेंज नाहीये. मला वाय फायचा पासवर्ड सांगतेस?" मी हात धुऊन रूचामावशीला विचारलं. "इथे इंटरनेट नाही रे. इंटरनेटसाठी शहरात जायला लागत. आठवड्यातून एक दिवस जातो शहरात. इथे टी.व्ही. पण नाहीये." रूचामावशीने बॉम्बच फोडला.

जेवण झाल्यावर मी, सारा आणि भूमी व्हरांड्यामधे बसून कॅरम खेळत होतो. गार वारं होतं. सुंदर चांदणं होतं. "मस्त खेळतोस तू." भूमी मला म्हणाला.

"तू पण शाळा सोडली ना?" मी मान हालवली.

"गेंड्याने राडा केला सगळा" मी म्हणालो आणि भूमीला सगळी कथा सांगितली. "तुला नाही जायचं नं हॉस्टेलला?" भूमीने विचारलं.

"अजिबात नाही." मी म्हणालो.

"मग चारपाच वर्षे हॉस्टेलला जाण्यापेक्षा, दोनच महिन्यांचा प्रश्न आहे. रहा ना इथे."

"मावशीला सांग ना मला असंच सर्टिफिकीट द्यायला की तो आता असं वागणार नाही."

"आई नाही ऐकणार रे असं काही. मीपण नाही सांगणार तिला."

"पण करू काय इथे दोन महिने? इथे काहीच नाहीये." मी म्हणालो.

"ये इकडे" असं म्हणून भूमी मला आरशासमोर घेऊन गेला आणि म्हणाला, "एखादा laptop किंवा phone घ्यायचा असला तरी आपण त्याचे सगळे features study करतो. पूर्ण माहिती मिळवतो. तू आयुष्यभर या मी नावाच्या मशीनला वापरणार आहेस. दोन महिने इथे राहिलास तर आजोबा तुझी तुझ्याशी नीट ओळख करून देतील."

त्याचं म्हणणं पटत होतं तरी रूचामावशी बरोबर परत जायचं असा हट्ट मनात तयार झाला होता. मनात भीती, राग आणि कंटाळा सगळंच वाटत होतं. मी आरशातल्या माझ्याकडे बघत राहिलो 'खरंच कोण आहे मी? अनी? युनिव्हर्स?'

**'तुमची ओळख काय? आरशात तुम्हांला काय दिसतं?'**

**'अनी परत जाईल का ताओ आजोबांकडे राहील?'**


**तुमची उत्तरं नाव, इयत्ता, शाळा, गाव लिहून खालील व्हॉट्सअप क्रमांकावर पाठवा.**

**संपर्क : ९८२२०३३०७५**

---

## चिंटू

**चारूहास पंडित/ प्रभाकर वाडेकर**



# ‘ग’ ची गंमत

श्रीनिवास प्रभुदेसाई

## खालील चित्रात ’ग’ अक्षराची ३५ चित्रे लपली आहेत. शोधा पाहू.




उत्तर : (१) गणपती (२) गणित (३) गरुड (४) गवंडी (५) गाढव (६) गुलाबजाम (७) गृहिणी (८) गुढी (९) गुरुजी (१०) गरीब (११) गालिचा (१२) गोरिला (१३) गारुडी (१४) गाडीवान (१५) गाडी (१६) गावकरी (१७) गायक (१८) गिरणी (१९) गाय (२०) गांडूळ (२१) गुच्छ (२२) गुपचूप (२३) गुटगुटीत (२४) गरम (२५) गोट्या (२६) ग्रंथ (२७) गिधाड (२८) गुराखी (२९) गुरखा (३०) गुंड (३१) गाळणं (३२) गवळी (३३) गोळ्या (३४) गुंडाळा (३५) गवत




# म्हणून तुझे तूच शिकायला जा!

■ डॉ. रुपेश पाटकर

फक्त अभ्यास शिकायला
तू शाळेत जाऊ नको राई,
तिथे खेळायला सवंगडी मिळतात म्हणून जा.

माणसे शिकायला जा.
ओळखपाळख नसलेल्यांशी दोस्ती करायला जा.
दोन घ्यायला आणि दोन द्यायला जा.
दुसऱ्याला सहन करायला जा.

विचार करणे शिकायला जा.
लिहिता-वाचता येण्याइतके विचार करणे सोपे नसते बाळा.
प्रतिज्ञा पाठ म्हणायला जाऊ नको राई,
सारे भारतीय माझे बांधव आहेत हे जगायला जा.

स्पर्धेत तू भाग घ्यायला जाऊ नको राई,
शिकायची प्रेरणा तिथे शोधू नको राई.
सायकल शिकताना फक्त मजा होती ना,
तशी शिकण्यातली मजा अनुभवायला जा.

तू इतरांपेक्षा किती हुशार हे महत्वाचे नाही राई,
सगळेच हुशार कसे होतील हे शिकायला जा.



सोबत तुझ्या कोणी उपाशी असेल,
तर त्याला तुझे बिस्कीट द्यायला जा.
दुसऱ्याची भूक जाणवायला शिकणे सोपे नसते बाळा.

शाळेत सांगितलेले सगळेच खरे नसते राई,
म्हणून निवडायची कला शिकायला जा.
चारचौघे वेगळे बोलताना ठाम राहणे सोपे नसते बाळा,
म्हणून न पटलेल्या गोष्टीला ठाम नाकारायचे कसे, हे शिकायला जा.



शिस्त शिक.
सामूहिक जीवन सुकर करण्यासाठी शिस्त शिक!
शिस्तीचा उद्देश समजून घे.
पण मूर्ख आज्ञा पाळणे म्हणजे शिस्त नव्हे.
चंद्र सिंग गढवालीला लक्षात ठेव!

आणि हो, शाळेत न गेलेल्यांविषयी आदर बाळगायला विसरू नको.
जनी, मुक्ता, बहीणा शाळेत गेल्या नव्हत्या हे लक्षात ठेव!

हे तुला कोणी फळा खडूने शिकवणार नाही राई.
म्हणून तुझे तूच शिकायला जा.

संपर्क : ९६२३६६५३२१





उत्तम सदाकाळ

# लपाछपी

मी चौथीला असतानाची गोष्ट. रविवारचा दिवस होता. शाळेला सुट्टी असल्याने दुपारपर्यंत आमचा नुसता धिंगाणा सुरू होता. सगळे खेळ खेळून झाल्यावर मला अभ्यासाची आठवण झाली. मग मी माझ्या मावसबहिणीच्या म्हणजे मंगलच्या घरी अभ्यास करायला आलो.

मंगलच्या घरात माझ्याच वयाची पाच सहा मुलं मुली होती. आम्ही सगळे एकत्र बसूनच अभ्यास करायचो. त्या दिवशीही आम्ही अभ्यासाला बसलो. हसत खेळत आमचा अभ्यास चालला होता. तासाभरातच आमचा सगळा अभ्यास संपला.

अभ्यास करता करता चार वाजले होते. संध्याकाळ व्हायला अजून थोडा अवधी होता. त्यामुळे लगेच घरी जायची मला घाई नव्हती. मग मीच मुलांना म्हटले,

“आपण एखादा खेळ खेळायचा का?”

“हो! खेळूया आपण खेळ.” सगळेच आनंदाने होकार देत ओरडले.

“कोणता खेळ खेळायचा?” मी विचारले.

“अं...आपारपी खेळूया का?” संतोषने विचारले.

“नको. त्यासाठी अगोदर कापडाचा चेंडू बनवावा लागेल.” मंगल म्हणाली.

“मग गाण्याच्या भेंड्या खेळूया.” लताने तिच्या आवडीचा खेळ सुचवला.

“काही नको भेंड्या! तुझी सगळी गाणी पाठ आहेत. आमची गाणी पाठ नसल्याने भेंड्याच्या खेळात तूच जिंकतेस. त्यापेक्षा दुसरा खेळ खेळूया.” सगळ्यांनीच लताच्या म्हणण्याला विरोध केला.

“मग कोणता खेळ खेळायचा?” नाराज झालेल्या लताने विचारले.

“आपण लपाछपीचा खेळ खेळूया का? फार मजा येते लपाछपी खेळताना.” मी माझे मत मांडले.

“हो. हो. चालेल. आपण लपाछपी खेळूया.” सगळ्यांनी माझ्या सूचनेला मान्यता दिली. मग आम्ही लपाछपी खेळायचे ठरवले.

लपाछपी खेळण्यासाठी माझ्या बहिणीचे घर अगदी योग्य होते. लाकडी कडीपाटाचे आणि भक्कम माळा असणारे मंगलचे घर म्हणजे आमचे खेळाचे मैदानच होते.

आमचा खेळ सुरू झाला. सुरुवातीलाच माझ्यावर राज्य आले. बाकीचे सवंगडी लपण्यासाठी घरभर पांगले. योग्य जागा पकडून सगळे जण लपले. मी प्रत्येकाला शोधण्याचा प्रयत्न करू लागलो. पण मंगलचे घर एवढे मोठे होते की मला लपलेले माझे सवंगडी काही केल्या सापडेनात.

माझ्यावरचे राज्य खूप वेळ चालले. मी त्यांना शोधून शोधून थकलो. तासभर मी त्यांना शोधण्यासाठी धडपडत होतो. पण एकदाही मला सगळे सवंगडी शोधता आले नाहीत. राज्य घेऊन घेऊन मी रडकुंडीला आलो होतो. अखेर माझी दया येऊन मुलांनी माझ्यावरचे राज्य दुसऱ्या मुलाला दिले मग मात्र मी मनाशी ठरवले की, आता यांना लवकर सापडायचेच नाही. अशा ठिकाणी लपून बसायचे की, हे सारे मला शोधताना वैतागले पाहिजेत.

मग काय मनाशी ठरवल्याप्रमाणे मी लपण्यासाठी मुलांची नजर चुकवून जिन्याने माडीवर आलो. माडीवर काळामिट्ट अंधार होता. या अंधारात मी कुणाला दिसणार नाही याची मला खात्री होती. तरीही उगाच धोका नको म्हणून या अंधारातच मी अशी जागा शोधत होतो की, जेथे मला कुणी शोधू शकले नसते.

अंधारात माडीवर इकडून तिकडे फिरत मी जागा शोधत होतो. तोच माझी नजर जिन्याच्या वर असणाऱ्या एका जागेकडे गेली. जिन्याने सरळ वर चढून आले की अगदी समोरच ती जागा होती. वरून लाकडी झाकण लावून बंद केलेल्या त्या जागेत धान्य साठवतात हे मला मंगलने मागे एकदा सांगितले होते.

मी त्या जागेत लपण्याचे ठरवले. मग मी पटकन त्यावरचे झाकण उचलले. आत पाय टाकला... आणि इथेच माझे नशीब माझ्यावर रुसले.

मी ज्या जागेत लपायला गेलो होतो ती जागा म्हणजे एक खोल 'बळद' होते. बळद म्हणजे धान्य साठवण्यासाठी भिंतीमध्ये तयार केलेली खोल अंधारी जागा. जिन्यासमोरील त्या बळदाचा मंगलच्या घरचे लोक धान्य साठवण्यासाठी उपयोग करायचे. आणि मी नेमका त्यात लपण्यासाठी गेलो. अंधार असल्याने मला ते बळद किती खोल आहे हे समजले नाही. आत पाय टाकताच मी एखाद्या पोत्यासारखा दाणकन त्या बळदात आदळलो.

बळद खूप खोल होते. धान्याने ते भरलेले नव्हते. पण माझे सुदैव त्यात तळाला थोडेसे धान्य शिल्लक होते. मी वरून जो आदळलो तो त्या धान्यावरच.

धान्यावर पडल्याने मला फारसे लागले नव्हते. मात्र खाली कोसळताना बळदाचे वरचे लाकडी झाकण आपोआप बंद झाले. झाकण बंद झाल्याने मी अलगदपणे त्या अंधाऱ्या बळदात कैद झालो. आजूबाजूला काळाकुट्ट अंधार... दमट आणि कुबट वास... आणि वरून पडल्यामुळे अंगभर पसरलेल्या वेदनांनी मला रडू कोसळले.

मी मदतीसाठी हाका मारू लागलो. पण माझ्या हाका काही कोणाच्या कानावर पडल्या नाहीत. बराच वेळ झाला. माझी सुटका करायला कोणी आले नाही. रडून-रडून माझे डोळे सुजले आणि हाका मारून माझा घसा बसला. मी कुणाला सापडू नये म्हणून या बळदात शिरलो होतो. अन् आता मला कुणीतरी शोधावे आणि येथून बाहेर



काढावे असे मला वाटत होते.

लपाछपी खेळणारी माझे मित्रही इकडे माडीवर फिरकले नाहीत. मी एकटाच या अंधाऱ्या बळदात अडकून पडलो होतो. कुणीतरी माडीवर येईल आणि माझी या बळदातून सुटका करील

या आशेने मी मान वर करून बळदाच्या बंद दाराकडे बघत होतो. मधूनच क्षीण आवाजात सुटकेसाठी हाका मारत होतो. पण कुणीही वर आले नाही.

सुटकेची वाट बघून बघून मी थकलो. बळदाच्या आत भिंतीला पाठ टेकवून मी असहायपणे बसलो. अन् तशा अवस्थेत माझा नकळतपणे डोळा लागला.

इकडे मला शोधून शोधून वैतागलेले माझे सवंगडी खेळ बंद करून निघून गेले. त्यांना वाटले की, मी राज्य येईल या भीतीने घरी पळून गेलो असेल. मी माडीवरील बळदात अडकलोय याची त्यांना कल्पनाच नव्हती.

बघता बघता रात्र झाली. रात्र होऊनही मी घरी न पोहोचल्याने आई-बाबा घाबरले. त्यांनी मला गावभर शोधले. मी कुठेच दिसेना तसा त्यांचा धीर सुटला. मग मंगलच्या घरी येऊन त्यांनी माझी चौकशी सुरू केली.

"मंगल, किशोर आला होता का इकडे? रात्र झालीय तरी तो घरी आला नाही. कुठे गेलाय कुणास ठाऊक... आम्ही सगळीकडे शोधले पण त्याचा पत्ता नाही. तुला काही माहीत आहे का?" आईने काळजीने विचारले.

"मावशी, मघाशी किशोर आणि आम्ही इथेच खेळत होतो. लपाछपी खेळताना तो लपायला गेला आणि परत आम्हांला दिसलाच नाही. आम्हांला वाटले तो घरी पळून गेला असेल." मंगलने सांगितले.

मुले इथेच लपाछपी खेळत होती अन् तेव्हापासूनच मी बेपत्ता आहे हे लक्षात येताच माझे आईबाबा घाबरले. मग घाई करत सगळे जण माझा घरात शोध घेऊ लागले. काही जण घराच्या आसपास मला शोधू लागले. आई तर रडवेली होऊन मला हाका मारत शोधत होती. मला मात्र बाहेर काय चाललेय याची काहीच कल्पना नव्हती. मी रडून रडून बळदात झोपी गेलो होतो.

मंगलचे बाबा आणि माझे बाबा कंदील घेऊन मला शोधायला माडीवर आले. ते माडीवर माझा शोध घेत असताना मी त्यांचा आवाज ऐकला. अन् मी ताडकन जागा झालो.

सुटकेच्या आशेने मी बळदातून ओरडू लागलो. माडीवर माझा शोध घेणाऱ्या माझ्या बाबांनी माझा आवाज ऐकला. तसे त्यांनी बळदाचे झाकण उघडले. कंदिलाच्या प्रकाशात त्यांनी बळदात डोकावले. बळदाच्या तळाशी रडणारा आणि सुटकेसाठी हाका मारणारा मी त्यांना दिसलो.

मग घाई करत त्यांनी बळदात उतरून मला वर काढले. बळदात पडल्याने माझी झालेली अवस्था पाहून आईला तर रडूच कोसळले. तिने मला पोटाशी धरत पटापट माझे मुके घेतले. एवढा वेळ माझ्या काळजीने धसतावलेले तिचे आईचे काळीज मी सुखरूप असल्याचे बघून आनंदाने हरखले.

आई माझ्याकडे बघता बघता मधूनच रडत होती अन् मधूनच हसत हसत माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करत होती. लपाछपी खेळता खेळता संकटात सापडलेल्या आपल्या लेकराकडे बघून तिच्या चेहऱ्यावरही आसू आणि हसू यांची लपाछपी चाललेली होती.

**संपर्क : ९०११०१६६५५**

# ढाणू गाढव

■ किरण येले



एक होते गाढव
त्याचे नाव ढाणू
सारखा सांगे मालकाला
“मला ‘गाढव’ नका हो म्हणू
चुका केल्या तर काय झालं काय?
पगार तरी देता काय?”

तरीही मालक ऐकेना
चुकाही बंद होईना
मग ढाणूला आला राग
तो मनात झाला वाघ





एका सकाळी लवकर उठला
वाघासारखा चालू लागला
वाघासारखा हसला
वाघासारखा बसला
वाघासारखा शिकार शोधत
गावभर हिंडला
कुत्रे आले अंगावर तेव्हा
जोरात फोडली डरकाळी
कुत्रे तर घाबरलेच
पण स्वत:ही झाला गर्भगळी



गावात झाली एकच धावपळ
गाढवाच्या अंगात शिरलेय वाघळ
दारे खिडक्या बंद करून
सगळा गाव बसला घाबरून
इकडे मालक फिरत होता गाढव गाढव करत
तिकडे ढाणू सुनसान रस्त्यावर डरकाळ्या फोडत

ढाणूला वाटली खूपच मजा
म्हणाला मालकाला देऊ सजा
आपल्याला आता मालकही घाबरेल
गाढवा गाढवा म्हणायचे थांबेल
मग आपणच त्याला आदेश देऊ
गाढवा... गाढवा म्हणून घेऊ
म्हणू चांदीच्या ताटात जेवायला दे
आज चालून कंटाळलोय, पाठुंगळी घे



पण इकडे काय चालू
तिकडे झाले भलतेच
मालकाला जेव्हा समजली बातमी
म्हणाला ही तर संधी नामी
बिनकामाचे गाढव जाईल
घरात पैशाचा ओघ येईल
मालकाने लावला शहरात फोन
शहरातून आल्या गाड्या दोन
एकात रिंगमास्टर एकावर पिंजरा
बघायला जमली गावची जत्रा




रिंगमास्टरने झाडताच चाबूक
आवाज उमटला हवेत 'रब्बूक'
ढाणूने रागात देताच डरकाळी
चाबकाची पाठीवर रेघ काळी
कळवळून म्हणाला हे किती वाईट
लोक वाघाचाही मान राखत नाहीत
त्यालाही छळतात, सर्कशीत नेतात
चाबूक दाखवून काम करून घेतात
असल्या वाघोबाचे काही नव्हे खरं
आपण आपले 'गाढव' आहोत तेच बरं

संपर्क : ९८६९२६०७८०



# गंमत खेळ

■ राजीव तांबे




**साहित्य :** १ पत्त्यांचा जोड, २ कागद, २ पेन्सिली

**खेळाची तयारी :** हा खेळ दोन गटांत किंवा कितीही जणांत खेळता येतो.

घरात खेळताना 'आई' आणि 'बाबा' असे दोन गट आहेत. आईच्या गटात अन्वय, रोहन आणि आजी. बाबांच्या गटात सारा, प्रिया आणि आजोबा. प्रत्येक गटाने आपल्याकडे कागद पेन्सिल घ्यायची. पत्त्यांमधील सर्व राजा, राणी आणि गुलाम काढून बाजूला ठेवायचे. उरलेले पत्ते पिसून टेबलावर ठेवायचे.

**चला खेळूया :** आता दोन्ही गटांनी मिळून १५ ही संख्या घेतली आहे असे समजूया. प्रथम आई गट खेळेल. आई गटातील अन्वय टेबलावरील पत्त्यांतील कोणताही एक पत्ता घेईल. हा पत्ता पंजी म्हणजे ५ आहे.

आई गटाला १५ + ५ = २० गुण मिळाले. आता बाबा गटातील सारा टेबलावरील पत्त्यातील कोणताही एक पत्ता घेईल. हा पत्ता अठ्ठी म्हणजे ८ आहे.

बाबा गटाला १५ + ८ = २३ गुण मिळाले. याप्रमाणे प्रत्येक गटाने आळीपाळीने उचललेल्या पत्त्यांची बेरीज करत जायचं. लवकरात लवकर १०० व्हायला हवे.

## (१) पुढे चला...




**नियम :** एकदा उचललेला पत्ता पुन्हा वापरायचा नाही. तो बाजूला ठेवून द्यायचा.

एकाच वेळी चुकून दोन पत्ते उचलल्यास त्यातील लहान संख्येचा पत्ता घ्यावा आणि दुसरा पत्ता बाद करावा.

**कोण जिंकेल :** ज्यांचे सर्वात आधी १०० होतील तो गट जिंकेल.

## (२) अदलाबदली

**साहित्य :** २ वेगवेगळ्या रंगाचे फुगे.(जर दोन वेगवेगळ्या रंगांचे फुगे नसतील तर एकाच फुग्यावर स्केच पेन किंवा बॉलपॉइंट पेनने चांदण्या / ठिपके काढा.)


**खेळायची तयारी :** हा खेळ दोन गटात किंवा कितीही जणात खेळता येतो. आज घरात आई, बाबा, अन्वय, रोहन, सारा, प्रिया, आजी आणि आजोबा आहेत. हे सर्व मिळून हा खेळ खेळत आहेत. दोन्ही फुगे फुगवून घ्या. आता आपण असं समजू या की, एक फुगा लाल रंगाचा आहे तर दुसरा फुगा निळ्या रंगाचा आहे. सारा उजव्या हातात लाल रंगाचा फुगा घेईल आणि डाव्या हातात निळ्या रंगाचा फुगा घेईल.

**चला खेळूया :** सारा दोन्ही फुगे एकदमच हवेत उडवेल. फुगे हवेत असतानाच सारा फुग्यांची अदलाबदली करेल. फुगे हवेत उडवण्याच्या आधी साराच्या उजव्या हातात लाल व डाव्या हातात निळा फुगा होता. फुगे हवेत उडवल्यानंतर सारा उजव्या हाताने निळा व डाव्या हाताने लाल फुगा पकडेल. ही झाली अदलाबदली. प्रत्येक वेळी अशीच अदलाबदली करायची आहे.

**नियम :** १) फुगे झेलताना फुगा जमिनीवर पडल्यास खेळाडू बाद.अदलाबदली न करता फुगे झेलल्यास खेळाडू बाद. २) फुगा झेलताना फुग्याचा किंवा हाताचा जमिनीला स्पर्श झाल्यास खेळाडू बाद.

**कोण जिंकेल :**

पहिल्या फेरीत प्रत्येकाला ७ चान्स आणि दुसऱ्या फेरीत प्रत्येकाला ६ चान्स. ज्याचे सर्वात आधी ९ गुण होतील तो जिंकला.





**संपर्क : ९३२२३९९८५९**

मनोज बोरगावकर

# बंधुत्वाचे मंदिर



# कथा सद्गुणाची

बायबलमध्ये एक फार छान वाक्य आहे., “जेव्हा तुम्ही स्वतःवर जेवढे प्रेम करता, तेवढेच प्रेम तुमच्या शेजाऱ्यांवरही करू लागता तेव्हा तुम्ही निसर्गाच्या नियमाचे तंतोतंत पालन करीत असता.” किती सुंदर आहे ना हे!

आपल्या साऱ्यांना जोडणारी एक बंधुत्वाची तार आहे याचे भान आपण प्रत्येकाने ठेवलेच पाहिजे. कारण ही तार जेव्हा तुटेल तेव्हा या पृथ्वीवर दुष्टतेशिवाय दुसरे काहीही शिल्लक उरणार नाही. आपल्याला आपल्यातल्या सज्जनपणाला, चांगुलपणाला सतत तेवते ठेवायचे आहे. गाभाऱ्यातला इवलासा दिवा जसा संपूर्ण गाभारा प्रकाशमान करीत असतो ना अगदी तसेच माणसातली बंधुत्वाची, सज्जनपणाची भावना आपला सभोवार उजळून टाकत असते. पण याची सुरुवात तुम्हांला तुमच्यापासूनच करावी लागेल. त्यासाठी फार वेगळे असे काही करायची गरज नाही. तुमच्या आत दडलेला चांगुलपणा फक्त शोधून काढावा लागेल. तुम्ही परीस नावाच्या दगडाबद्दल ऐकले आहे का? असे म्हणतात तो परीस लोखंडाला लावला की त्याचे रूपांतर सोन्यात होते!

पण आज आपले काय झाले आहे मित्रांनो, चांगुलपणाचा परीसही आपल्याजवळ आहे.... आणि ती इच्छा पण आहे.... पण नेमकं झालंय काय की लोखंडाचे सोन्यात रूपांतर होण्यासाठी तो परीस लोखंडाला लावावा लागतो हेच आपण विसरून गेलोय. सज्जनपणा हा आपला आतला आवाज आहे... पण बाकी दुर्गुणांच्या आवाजाच्या वाढत्या गदारोळात आपल्यातील सद्गुणांचा आवाजही ऐकायचा असतो हेच आपण विसरून गेलो. मला इथे शिखांचे गुरू गुरूनानक देव यांची एक कथा सांगण्याचा मोह आवरत नाही. फार सुंदर आणि अर्थपूर्ण असा किस्सा आहे तो. नानकजी फिरत फिरत एका गावात जातात... ते गाव सज्जन आणि चांगल्या माणसांनी अगदी तुडुंब भरलेलं असतं. जागोजागी त्या गावात सगळी चांगलीच माणसं असतात... अगदी डिट्टो तुमच्यासारखीच चांगली माणसं बरं का मुलांनो! मग नानकदेवजी त्या गावच्या मुखियाला आपल्या शिष्याबरोबर निरोप पाठवतात “की बाबा रे मला या सज्जन – चांगल्या माणसांच्या गावात थोडे दिवस राहण्याची खूप खूप इच्छा आहे. तुझी परवानगी आहे ना मला गावात येऊन राहण्यासाठी?”

त्या गावचा मुखिया खूप चांगला माणूस तर असतोच पण तो खूप हुशारही असतो. तो काय करतो नानकजींचा जो शिष्य हा निरोप घेऊन आलेला असता त्यांच्या बरोबर दुधाने काठोकाठ भरलेला एक पेला देऊन तो पेला नानकजींना द्यायला सांगतो.

तो काठोकाठ भरलेला दुधाचा पेला घेऊन शिष्य नानकजींकडे येतात. गुरूनानक तो पेला पाहून हसतात आणि समोरच्या जुईच्या वेलीवरचे फूल तोडून त्या दुधाने काठोकाठ भरलेल्या पेल्यात टाकून तो पेला पुन्हा त्या गावच्या मुखियाकडे परत पाठवतात. मुखिया त्या काठोकाठ भरलेल्या दुधाच्या पेल्यात टाकलेल्या जुईच्या फुलाकडे पाहतो, गालातल्या गालात हसतो आणि त्या शिष्यांसोबत नानकजींना सन्मानाने गावात वस्तीला

येण्याचे निमंत्रण देतो.

दुधाचा काठोकाठ भरलेला पेला घेऊन येरझारा घालणाऱ्या शिष्याला यातले गौडबंगाल काहीच कळत नाही. तो गुरूनानकांना विचारतो, "गुरूजी हे काय चाललयं? तो दुधाचा पेला पाठवतो... तुम्ही जुईचे फूल टाकून पाठवता आणि मुखिया लगेच तुम्हांला गावात वस्तीला यायचे निमंत्रण देतो... हे सगळं चाललंय तरी काय हो?" नानकजी हसतात आणि या सगळ्या निरोपानिरोपी मागचं गूढ त्याला सांगतात. नानकजी म्हणातात, "बेटा, मी त्या मुखियाला मी तुमच्या गावात राहायला येऊ का असा निरोप पाठवला तर त्याने लगेच तुझ्या सोबत दुधाचा शिगोशिग भरलेला पेला पाठवला. या कृतीतून त्याला सुचवायचे होते की हे गाव आधीच सज्जन, चांगल्या माणसांनी काठोकाठ भरलेलं आहे. आता इथे राहायला अजिबात जागा नाही. आपण दुसऱ्या गावात राहायला जावे जिथे चांगल्या माणसांची अतोनात गरज आहे." नानकजींच्या शिष्याने लगेच विचारले की, "मग तुम्ही जुईचे फूल त्या पेल्यात टाकून पाठवले की त्याने तुम्हांला लगेच सन्मानाने गावात येऊन राहण्याचे निमंत्रण कसे काय दिले?"

नानक हसले आणि म्हणाले, "अरे वेड्या, मी त्या दुधाने काठोकाठ भरलेल्या पेल्यात जेव्हा जुईचे फूल टाकले तेव्हा दुधाला थोडा तरी धक्का लागला का? पेल्यातले दूध जरा तरी सांडले का? नाही ना! याचाच अर्थ असा की त्या पेल्यात जुईचे फूल टाकून मी त्याला उलटपावली संदेश दिला, की बाबा रे दुधाने काठोकाठ भरलेल्या पेल्यात जुईचे फूल टाकल्याने जशी कोणतीच हालचाल झाली नाही; सांडासांड झाली नाही ना त्याचप्रमाणे आमच्या येण्यानं तुमच्या गावाच्या चांगुलपणाला कोणताही धक्का लागणार नाही. माझा हा निरोप मुखियाला कळला आणि लगेच त्याने सन्मानाने आपल्याला गावात येण्याचे निमंत्रण दिलं."

किती सुंदर आहे ना नानकजींची ही कथा. दुधाच्या पेल्यात जुईचं फूल पडल्यानं जसा त्या पेल्याला कोणताच त्रास किंवा इजा झाली नाही किंवा दूध सांडले नाही त्याप्रमाणेच आपल्या वागण्याने कोणालाही इजा होणार नाही याचे भान आपण प्रत्येकाने ठेवले की आपोआपच हे जग बंधुत्वाचे मंदिर होऊन जाईल. किती सोपे आहे ना हे मुलांनो...मग चला तर आपण सगळे ते जुईचे फूल होऊ या आणि हे जग चांगुलपणाने काठोकाठ भरून टाकू या.

**संपर्क : ९८६०५६४१५४**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस सर्व्हे नं. ४८, घर पट्टी नं. ४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे ४०० ६१२, येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक– कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane- 400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune- 411 004 * Editor : Krishnakumar Patil.**

# फुलपाखरू

■ प्रशांत असनारे



बागेत
तो लहानसा मुलगा
दुडूदुडू धावत
कधीचा प्रयत्न करतोय
फुलपाखरू पकडण्याचा
पण त्याला
अजून ते जमलेलं नाही.

शेवटी तो थकतो
थांबतो
अन् रागानं खाली बसतो
गाल फुगवून.

अगदी तेव्हाच
ते फुलपाखरू भिरभिरत येते
अन् हळूच बसते
त्याच्या फुगलेल्या गालावर
एक गुलाबी फूल समजून

संपर्क : ९७६३७१४३०४

अभिजित पेंढारकर



# शोध गुप्त खजिन्याचा

"ए, कुणीतरी पाणी द्या रे! आई गं...दमले!" असं म्हणून ईरा मट्टकन खाली बसली.

"पाणी संपलंय, असं तुला मघाशीच सांगितलं ना?" तेजस तिच्यावर डाफरला.

"काय रे...! तुम्हांला आणखी एक जास्तीची बाटली आणायला काय झालं होतं?" ईरा फणफणत म्हणाली.

"तुला तुझी स्वतःची बाटलीसुद्धा घ्यायची आठवण नाही. वाटेत आमच्याच बाटलीतलं पाणी प्यायली आहेस आणि आमच्यावरच काय ओरडतेयंस?" तेजसही चिडला होता.

त्यांची भांडणं आणखी वाढू नयेत, म्हणून मितिषा आणि राजू मध्ये पडले. खरंतर डोंगर चढून पुन्हा अर्धा उतरल्यानंतर सगळेच थकले होते. त्यातून रस्ता चुकले होते. आता पुढे जायचं त्राणही कुणाच्या अंगात नव्हतं, पण जावं तर लागणारच होतं.

"मी आधीच म्हटलं होतं, असं खजिनाबिजिना काही नसतं. उगाच तंगडतोड झाली!" मितिषा ईराला म्हणाली.

"ही माझी नाही, राजूची आयडिया होती!" ईरानेही लगेच उत्तर देऊन टाकलं. खरंतर डोंगरावर जाण्याची

योजना राजूच्याच डोक्यातून निघालेली होती. त्याच्या आजोळच्या रामदरा या गावी तो ईरा, मितिषा आणि तेजस या मित्रांना घेऊन आला होता. गावात सगळेच रमले होते. एके दिवशी गावाच्या जवळच असलेल्या भोरगड या गडावर जाण्याची योजना राजूनं सांगितली. नुसते फिरून येतो, असं त्यानं मामाला सांगितलं होतं, पण त्याच्या डोक्यात काहीतरी वेगळंच सुरू होतं. शहरातून आणलेला नकाशा त्यानं मित्रांना दाखवला आणि या गडावर, वाघजाई मंदिराच्या मागच्या बाजूला एका गुहेत गुप्त खजिना आहे, अशी गुप्त माहितीही दिली. मित्रांनी लगेच तिकडे जायची तयारी दाखवली. लायब्ररीतून आणलेल्या एका पुस्तकात गुप्त खजिन्याच्या बऱ्याच गोष्टी त्यांनी वाचल्या होत्या. या गडावर तो नक्की मिळणार, अशी त्यांना खात्री होती. खजिना सापडल्यावर काय काय करायचं, ह्याच्याही प्रत्येकाच्या योजना तयार होत्या.

ईराला महिनाभर पुरतील एवढी चॉकलेट्स त्या पैशातून घ्यायची होती. तेजसला बास्केटबॉल खेळण्यासाठी हवेत उडणारे बूट घ्यायचे होते. मितिषाचा मुळातच खजिन्यावर विश्वास नव्हता. तिला काही नको होतं. राजूचं मात्र खजिन्यातल्या पैशातून काय करायचं ते अजून ठरत नव्हतं. विमान विकत घ्यावं, की शत्रूशी लढायला एखादं मिसाईल खरेदी करावं, याच्यावर त्याचा विचार सुरू होता. खजिना मिळणार, याबद्दल मात्र सगळ्यांना खात्री होती.

भोरगडावर हाश्श हुश्श करत सगळे पोहोचले, पण वाघजाई मंदिराच्या परिसरात खजिना काय, गुहासुद्धा कुठे दिसली नाही. त्यातून येताना ते ओळखीची वाट चुकले आणि खूपच दमले. एवढ्यात तेजसचं समोर लक्ष गेलं आणि तो एकदम ओरडला.

"ए, समोर बघ काय आहे!" सगळ्यांनी तिकडे बघितलं, तर एका झाडाच्या आडोशाला, सावलीत एक पडकी झोपडी त्यांना दिसली. त्यात एवढं कौतुकानं दाखवण्यासारखं काय आहे, ते मितिषाला समजलं नाही.

"अगं, असं काय करतेस? आपण वाचलेल्या गोष्टीत नाही का, एक म्हातारी असते, तिच्याकडे एक जादूची चटई असते, त्यावर बसलं, की ती चटई उडायला लागते आणि आपल्याला हवं तिथे पोहोचवते!" तेजस उत्साहानं सांगायला लागला.

"मग?" मितिषा तेवढ्याच थंडपणे म्हणाली.

"मग काय मग? अगं, इथेही तशीच एखादी म्हातारी असली आणि आपल्याला जादूची चटई मिळाली तर? आपण डायरेक्ट उडत राजूच्या मामाच्या घरापाशी पोहोचू ना.. ? भारी!" तेजसचे डोळे चमकत होते.

"ए, पण मला एक कळत नाही, चटई उडायला लागल्यावर आपण बॅलन्स कसा करायचा? मला तर साधा सायकलवरचा बॅलन्स अजून जमत नाही!" ईरा म्हणाली आणि मितिषानं कपाळावर हात मारला.


तिचा तर त्या झोपडीकडे जायलाही विरोध होता, पण तेजस आणि राजूनं आग्रह केला, म्हणून तिला जावं लागलं. झोपडीत खरंच एक म्हातारी होती. मुलांचा आवाज आल्यावर काठी टेकत टेकत ती बाहेर आली. तिचा सुरकुतलेला चेहरा, पाठीत वाकलेलं अंग, पिंजारलेले केस असा अवतार बघून मुलं सुरुवातीला थोडीशी घाबरलीच. तिचा आवाज मात्र फारच गोड होता.

"काय हवंय रे बाळांनो? इकडे कसे आलात?" तिने विचारलं. ईरा थोडी घाबरली होती, पण तेजसने मात्र सगळं सांगून टाकलं. त्यांचा गडावर जाऊन खजिना शोधण्याचा प्लॅन, तिथे काहीच न सापडणं आणि येताना रस्ता चुकणं.

म्हातारीच्या झोपडीत माठात भरून ठेवलेलं थोडं पाणी होतं. तिनं ते मुलांना प्यायला दिलं. आतून चटई घेऊन ती बाहेर आली, तेव्हा तेजसला खरंच वाटलं, की ही जादूची चटई आपल्याला देणार! म्हातारीनं ती चटई स्वतःसाठी आणली होती. दुपारच्या वेळेत ती चटई अंगणात अंथरून थोडा वेळ डुलकी काढत असे. हिच्याकडून पाण्याशिवाय दुसरं काहीच मिळणार नाही, हे मुलांच्या लक्षात आलं.

"आजी, इथून रामदऱ्याकडे कसं जायचं?" राजूने पुढाकार घेऊन प्रश्न विचारला.

म्हातारीनं त्याच्याकडे पाहिलं आणि बडबडू लागली,



*“ह्या अंगाला दरी, त्या अंगाला कातळ.*
*त्यात कात टाकणाऱ्या, नागिणीची वळवळ*
*उतरून जाल जेव्हा, पायरी पायरी एकेक*
*तिथेच थोडी पुढे, आहे ग्यानबाची मेख”*

राजूला दोन क्षण काही कळेचना. त्यानं पुन्हा विचारलं, तिचं पुन्हा तेच उत्तर.

“मी काय म्हणतोय, आजीला कळतच नाहीये!” राजू वैतागला. आता तो भांडायला उठू नये, म्हणून तेजसनं त्याला अडवलं, मितिषा आणि ईराला खाणाखुणा केल्या आणि ते तिथून निघाले.

“अरे, पण गावात जाणार कसं? आपल्याला रस्ता कुठे माहितेय?” ईरा म्हणाली.

“अगं, त्या आजीनं आपल्याला कोडं घातलंय. ते सोडवलं, की रस्ता सापडेल.” तेजसचे डोळे चमकत होते. ईरा, राजू गोंधळून गेले होते. तेजसचे डोळे मात्र चमकत होते. तो पुढे निघाला, तसं सगळे त्याच्या पाठोपाठ निघाले. थोडं चालून गेल्यावर त्यांना एका बाजूला दरी आणि दुसऱ्या बाजूला मोठे काळे दगड लागले. 'ह्या अंगाला दरी, त्या अंगाला कातळ'चा अर्थ त्यांना समजला.

“इथूनच रस्ता असणार गावाकडे जायला!” तेजस म्हणाला.

“आजी म्हणाली होती, की 'त्यात कात टाकणाऱ्या नागिणीची वळवळ” मितिषाला आठवलं. नागिणीची वळवळ, म्हणजे वाकडीतिकडी पायवाट, हे तिच्या लक्षात आलं आणि तशी वाट समोर दिसलीही. पण कात टाकणारी म्हणजे काय, ते तिला समजलं नाही. राजू म्हणाला, “कात टाकणारी, म्हणजे प्रत्येक ऋतूमध्ये तिचं रूप बदलतं ना, म्हणून असेल.” बाकिच्यांनाही ते पटलं. त्या वाटेवरून पुढे गेल्यावर त्यांना पायऱ्यांचा उताराचा रस्ता दिसला. 'उतरून जाल जेव्हा, पायरी पायरी एकेक' ह्या वाक्याचा अर्थ त्यांना समजला.

“पण ग्यानबाची मेख म्हणजे?” ईरालाही काही कळेना. “ग्यानबाची मेख म्हणजे एखादी गूढ, न समजणारी गोष्ट.” मितिषाला तिच्या शिक्षकांनी सांगितलेलं आठवलं. म्हणजे हा रस्ता कुणालाच माहीत नसलेला, गावाकडे जाणारा शॉर्ट कट असणार. तिथला रस्ताही तसाच होता. गोंधळवून टाकणारा. एका ठिकाणी तर रस्ता संपतोच आहे की काय, असं वाटत होतं. पण पुढे एका दगडाच्या आधाराने थोडा वळसा घालून पुढे गेल्यावर नीट रस्ता दिसत होता. मुलांनी थोडं धाडस करून पुढे जायचं ठरवलं आणि त्यांना गावाकडे जायचा रस्ता स्पष्ट दिसू लागला. पुढच्या पंधरा मिनिटांत चौघेही राजूच्या मामाच्या घरी पोहोचले होते.

“मग, सापडला की नाही, खजिना?” मामानं विचारलं, तेव्हा राजूला धक्काच बसला. त्यांनी तर घरी काहीच सांगितलं नव्हतं. सगळे आश्चर्यानं बघायला लागले.

“अरे, दोन दिवस तुमची जी खुसपूस आणि खलबतं सुरू होती, ती कानावर आली होती माझ्या. पण म्हटलं, जाऊ देत, खजिना नाही, तर काहीतरी नवीन सापडेल. तशी तुम्हाला भोरगडावरून गावात परत येण्याची नवीन वाट सापडली की नाही? म्हणजे एक प्रकारे तुमची मोहीम यशस्वीच झाली!” मामा म्हणाला आणि मुलंही एक नवीन शोध लावल्याच्या जाणिवेनं आनंदून गेली.

**संपर्क :** ९८८१०९८०७०

# आंबा

रसाळ आंबे गोड गोड
चला खाऊया एकेक फोड
मस्त स्वाद केशरी रंग
आंबे खाण्यात सारे दंग!

हापूस, पायरी, बिटकी आणि रायवळ
किती चवी आगळ्या वेगळ्या
भोपळी, केशर, तोतापुरी
नाना परी चाखा सगळ्या!

कापून घेता नीटनेटके
बशीत घेऊन सुबक खावे
चोखून खाता रस गळतो
कोपरावरून तो खाली धावे!

पेटीत बसतात आम्र राजे
दूर देशी करतात प्रवास
पिकल्यावरती घमघम येतो
लांबून सुद्धा गोड वास!

झाडावरच पिकलेल्यांची
भलतीच अवीट मधुर गोडी
आजोळ, मामा, मामी यांचे
घट्ट प्रेमळ नाते जोडी!

साट म्हणजे आंबा पोळी
मुरांबा ही बरणीत बसे
रस आटवून बर्फी बनते
टिकवून ठेवा जशास तसे!

अख्खा महिना आमरस खाऊन
सुस्त आणि तृप्त व्हावे
फळांच्या या राजासाठी
कोकणप्रांती भटकून यावे!



■ चारुता प्रभुदेसाई
संपर्क : ९९२२७५१८१९



# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो, 'किशोर'एप्रिल२०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ मे २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

## Q&A

**१) नुकत्याच झालेल्या एका आंतरराष्ट्रीय निरीक्षणावरून कोणत्या देशात सर्वाधिक यु-ट्यूब प्रेक्षक संख्या आहे?**
१) अमेरिका २) इंडोनेशिया
३) भारत ४) चीन

**२) आशिया खंडात सर्वात अधिक तृणधान्य उत्पादन करणारा देश कोणता आहे?**
१) चीन २) बांगला देश
३) जपान ४) भारत

**३) खालीलपैकी कोणत्या ठिकाणाला सह्याद्रीची राणी म्हणतात?**
१) कोयना २) भंडारदरा
३) जायकवाडी ४) उजनी

**४) नुकत्याच झालेल्या टी-ट्वेन्टी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया संघाने कोणत्या संघाचा पराभव करून महिला टी-ट्वेन्टी विश्वचषक पटकावला?**
१) भारत २) दक्षिण आफ्रिका
३) इंग्लंड ४) न्यूझीलंड

**५) 'मराठी राजभाषा दिन' कोणत्या दिवशी साजरा करण्यात येतो?**
१) १ मे २) २७ फेब्रुवारी ३) १ एप्रिल ४) ३१ जानेवारी

**६) महिला धोरण मांडणारे भारतातील सर्वात पहिले राज्य कोणते?**
१) केरळ २) आंध्र प्रदेश ३) गुजरात ४) महाराष्ट्र

**७) महाराष्ट्र शासनाने १० नोव्हेंबर २०२२ ला स्वीकारलेल्या मराठी वर्णमालेमध्ये एकूण किती वर्ण आहेत?**
१) ५२ २) ४२ ३) ३४ ४) २४

**८) राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्या (NAAC) अध्यक्षपदी कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे?**
१) डॉ.भूषण पटवर्धन २) डॉ.अनिल सहस्रबुद्धे
३) डॉ.नरेंद्र जाधव ४) डॉ.विनय सहस्रबुद्धे

**९) खालीलपैकी कोणते तंत्रज्ञान हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे?**
१) व्हॉट्स ॲप २) फेसबुक
३) चॅट जीपीटी ४) इन्स्टाग्राम

**१०) नुकतेच निधन झालेले विष्णू विश्वनाथ करमरकर हे खालीलपैकी कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते?**
१) अर्थ २) क्रीडा ३) साहित्य ४) कला

**११) गोवा ते नागपूर प्रदेश जोडण्यासाठी कोणत्या महामार्गाची घोषणा करण्यात आली ?**
१) समृद्धी महामार्ग २) महाविकास मार्ग
३) महापर्यटन मार्ग ४) शक्तिपीठ मार्ग

**१२) समुद्रातील पाणी निळे का दिसते?**
१) समुद्रात निळ्या रंगाचे शेवाळ असते
२) प्रकाशाच्या विकीरणामुळे
३) नद्यांमधून समुद्राला निळे पाणी मिळते
४) यापैकी नाही

**१३) प्रकाशाचा वेग आवाजाच्या वेगापेक्षा अधिक का असतो?**
१) प्रकाशलहरी हलक्या असतात
२) ध्वनिलहरी जड असतात
३) ध्वनीलहरींना माध्यमांची आवश्यकता असते
४) प्रकाशलहरी अदृश्य स्वरूपात असतात

**१५) कोणत्या भारतीय माहितीपटाला नुकताच ऑस्कर पुरस्कार मिळाला आहे?**

१) आरआरआर २) नाटू नाटू

३) द एलिफंट व्हिस्पर्स ४) हाथी मेरा साथी

**१६) साने गुरुजींनी 'श्यामची आई' ही कादंबरी कोणत्या तुरुंगात असताना लिहिली?**

१) येरवडा २) तिहार

३) नाशिक ४) अहमदनगर

## चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

### चित्रकोडे एप्रिल २०२३ उत्तरे




### कुतूहल एप्रिल २०२३ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) ३ | ७) ३ | १३) २ |
| २) ४ | ८) १ | १४) १ |
| ३) ३ | ९) १ | १५) ३ |
| ४) १ | १०) १ | १६) ३ |
| ५) ३ | ११) २ | |
| ६) १ | १२) २ | |

### कुतूहल मार्च २०२३ – यशस्वी स्पर्धक

कु. श्रीरुप कोरडे, कु. अदिती जरळी, कु. सोहम दसोरे, कु. निमिशा भिंगे, कु. तन्मय देसाई, कु. दर्श बालावलकर, कु. अन्विता दसोरे, कु. ज्ञानेश्वरी चित्ते, कु. गणेश पळसकर, कु. सुवीर फडे, कु. भक्ती गवळी, कु. प्रणव दाभाडे

### चित्रकोडे मार्च २०२३ – यशस्वी स्पर्धक

- **पुणे** – कु. श्रेया गडे, कु. प्रांजल हेमाडे, कु. कौस्तुभ कुलकर्णी, कु. संस्कार जगदाळे, कु. अनुष्का ठोंबरे, कु. सात्विका यादव, कु. आदित्य खिरीड, कु. श्रेयस ठोंबरे, कु. हर्षदा भवार, कु. साक्षी दाभाडे, कु. श्रावणी भवार, कु. कार्तिकी फाळके
- **सातारा** – कु. तन्मय देसाई, कु. सृष्टी राजगे, कु. श्रेया जाधव, कु. समीक्षा करे, कु. श्रुती राजगे, कु. सुवीर फडे , कु. स्वानंद काटे, कु. जान्हवी कामटे, कु. सोहम कुलकर्णी, कु. आयेशा बागवान, कु. सई मांढरे, कु. साक्षी भोसले, कु. श्रद्धा देशमुख, कु. सुश्मित साळवेकर, कु. प्रणव मल्लाडे, कु. अनुष्का जाधव, कु. स्वामी क्षीरसागर, कु. प्रज्वल घागरे, कु. अथर्व राजापुरे, कु. अधिराज पाडळे, कु. तन्वी लंकेश्वर, कु. वरद साळी, कु. विरजा साळी, कु. स्वराली फणसे, कु. उज्मा बागवान, कु. अनुष्का इथापे, कु. मुक्ता फाटक
- **अमरावती** – कु. आभा चारथळ, कु. श्रेस्ती नळकांडे, कु. रणवीर ठाकूर,
- **ठाणे** – कु. रोहित भोईर, कु. दिव्यांशी मानकर, कु. वेदिका मानकर
- **मुंबई** – कु. अदिती जरळी, कु. अभय साळवी,
- **अकोला** – कु. राजनंद अरखराव,
- **अहमदनगर** – कु. शौर्य आठरे, कु. स्वरदा गायकवाड, कु. प्रेम झेवर
- **चंद्रपूर** – कु. संकल्प पाझारे, कु. कुणाल लिल्हारे, कु. वेदांत भोयर, कु रागिनी लिल्हारे, कु. अशिष लिल्हारे, कु. संस्कृती लिल्हारे,
- **बुलढाणा** – कु. सोहम दसोरे, कु. अन्विता दसोरे
- **सिंधुदुर्ग** – कु. ध्रुव कांदळगावकर, कु. धीरज डोईफोडे, कु. विनय कांबळे, कु. दीपक गावडे, कु. लोकेश महाले, कु. आयुष नाईक, कु. दीक्षा गावडे,
- **कोल्हापूर** – कु. मिहीर चौगुले, कु. पल्लवी रेडेकर, कु. प्रसाद गवळी, कु. कार्तिका पाटील
- **रत्नागिरी** – कु. धनश्री देसले, , कु. श्रीपाद चव्हाण
- **सोलापूर** – कु. निमिशा भिंगे, कु. आकाश बुळगुडे, कु. नैना शेख, कु. विद्याश्री वडरे, कु. योगिराज पाटील, कु. काजल कोळी, कु. सैफन शेख, कु. अलिना शेख, कु. विनुता लवटे, कु. संजना बिराजदार, कु. राजनंदिनी बिराजदार, कु. अर्पिता व्हनमाने, कु. आराध्या भौरगुंडे, कु. श्रेया जमादार, कु. स्नेहल बिराजदार, कु. मयुरी झळके,
- **नागपूर** – कु. रुद्र कन्नावार, कु. तनुश्री कन्नावार
- **नाशिक** – कु. श्रावणी भवर, कु. प्राची भवर, कु. रिया भवर, कु. अनुष्का जाधव, कु. स्वरा जाधव, कु. कावेरी जाधव, कु. यश जाधव, कु. ज्ञानेश्वरी पानसरे, कु. अनुष्का पानसरे
- **कल्याण** – कु. दर्श बालावलकर, कु. श्रुती परांजपे
- **धुळे** – कु. आयुष पाटील, कु. देवयानी कोळी
- **नांदेड** – कु. गुंजन निकम, कु. जैद शेख, कु. जिक्रा शेख
- **यवतमाळ** – कु. अंशुमन दमकोंडावार, कु. सिद्धी दमकोंडावार
- **जळगाव** – कु. तेजस महाजन, कु. रुद्र चौधरी, कु. प्रणय चौधरी, कु. यज्ञेश चौधरी, कु. केतन पाटील, कु. प्रणव अमृतकर, कु. वेदांत महाजन, कु. गौरव पाटील
- **बीड** – कु. जयवर्धन भांड

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



एके दिवशी मी सायकल चालवत असताना एक वृद्ध आजी– आजोबा रस्त्याच्या कडेला उभे होते. रस्त्याने वाहने सुरूच असल्याने त्यांना रस्ता ओलांडायचा आहे हे माझ्या लक्षात आले. मी जवळ जाऊन पाहिले असता ते आजोबा आंधळे असल्याचे मला समजले. आजीच्या सहाय्याने ते रस्ता ओलांडायचा प्रयत्न करीत होते. मी माझी सायकल बाजूला उभी करून रस्त्याने जाणाऱ्या एका काकांच्या मदतीने त्यांना रस्ता ओलांडण्यासाठी मदत केली. त्यांनी मला आशीर्वाद दिला. ही गोष्ट मी घरी सांगितली. घरच्यांनी माझे कौतुक केले.

**सोहम किशोर दसोरे**
इ. ६ वी (क), संत गजानन महाराज इंग्लिश स्कूल,
पोस्ट ऑफिस क्वार्टर, शेगाव ४४४२०३,

घरातली कामे आवरून मी शाळेत चालले होते. तितक्यात रस्त्यावर एक भिकारी भिक्षा मागत होते पुढे करून उभा होतो. मी लगेच जवळच्या दुकानात जाऊन बिस्किट पुडा आणून त्यांना दिला. ते आनंदी झाले. मी शाळेत पोहोचले तेव्हा मला सरांनी उशीर का झाला ते विचारले. मी सरांना हकिकत सांगितली. सरांनी मला शाबासकी दिली. मला खूप आनंद झाला.



**माहेश्वरी मोरे**
जि.प.प्रा. शाळा, पुरी, ता. चांदवड, जि. नाशिक ४२३१०१



एके दिवशी शेतात जाताना मला रस्त्यावर कुत्र्याची दोन पिल्ले ओरडताना दिसली. त्यांना उचलून एका झाडाच्या सावलीत ठेवून माझ्या जवळच्या भाकरीतून थोडी भाकरी देऊन मी पुढे गेले. शेतात ही गोष्ट आजोबांना सांगितली. आजोबांनी मला शाबासकी दिली. मला खूप आनंद झाला.

**श्रावणी ज्ञानेश्वर भवर**
जि.प.प्रा. शाळा, पुरी, ता. चांदवड, जि. नाशिक ४२३१०१



माझ्या शाळेजवळ एक वयस्कर आजी राहत होती. सन २०२१-२२ मधल्या मुसळधार पावसानं तिचं चौकट-दरवाजा नसलेलं व पाण्यानं भरलेलं घर सोडून ती शाळेच्या व्हरांड्यात मुक्कामाला आली होती. मी चौकशी केली असता तिला कोणीही नातेवाईक सांभाळत नव्हते हे माझ्या लक्षात आले. शाळा भरली की ती जवळच्या मारूतीच्या मंदिरात दिवसभर झोपून रहायची, तिला मी दुपारच्या वेळी शाळेतील भात-आमटीचे जेवण देत असे. अगदी दोन वेळी पुरेल इतके. तेव्हा मला ती आशीर्वाद द्यायची आणि काय झाले कोणास ठाऊक, सुट्टी सुरू झाली नी माझी आणि तिची भेट बंद झाली. पुन्हा शाळा सुरू झाली तेव्हा ती मला कोठेही दिसली नाही. मी चौकशी केली परंतु ती.. मला फार वाईट वाटले. क्षणभर माझे डोळे पाणावले. अंत:करण जड झाले. आजही मला दुपारच्या वेळी तिची आठवण येते.

**तेजस्वी अण्णा सरगर**
जि.प.मुलींची शाळा नं. २,
करगणी, ता. आटपाडी,
जि. सांगली ४१५३०६



माझी आई दररोज सकाळी लवकर उठून स्वयंपाक करायची व आमची तयारी करून द्यायची आणि कामाला निघून जायची. एके दिवशी माझ्या आईची तब्येत बिघडली व सकाळी ती झोपेतून उठलीच नाही. जेव्हा आम्ही उठलो तेव्हा आई उठलेली नव्हती. मी आईला उठवले व म्हणालो, “मम्मी ऊठ ना! दिवस वरती आलाय...” तेव्हा मम्मी म्हणाली, “अरे बाळा आज माझे गुडघे खूप दुखत आहेत.” तेव्हा मी पटकन उठलो आणि बामची बाटली घेऊन आलो आणि आईचे गुडघे चोळून दिले. आईला खूप बरे वाटले आणि आई काम करू लागली. मलाही खूप आनंद झाला.

**जीवक रोहन देहाडे,** इ. २री, जि.प.प्रा.शाळा, पिंपळद, नाशिक
मु.पो.पिंपळद (ना), ता.जि.नाशिक ४२२०१०



मे महिन्याचे दिवस होते. दुपारची वेळ होती. त्यामुळे बाहेर खूप कडक ऊन पडले होते. मी पप्पांसोबत दारात बसलो होतो. तेवढ्यात मला बाहेर गेटजवळ जोरात आवाज आला. मी बाहेर आलो. एक पक्षी धाडकन गेटजवळील भिंतीवरून खाली पडलेला होता. पप्पांनी मला सांगितले की, त्याचे नाव ‘लालबुड्या’ आहे. त्याला खूप तहान व भूक लागली असावी. मला त्याची दया आली. मी त्याला उचलले व घरात आणले. तो खूप थकला होता. मी त्याला पाणी पाजले व तांदळाचे दाणे खायला दिले. आता त्याला बरं वाटत होतं. मी त्याला सोडले तर तो उंच आकाशात उडाला. मला खूप आनंद झाला. सर्वांनी माझे कौतुक केले.

**वरद नरेश प्रधान,** इ. ४ थी, जि.प.केंद्रीय प्राथ. शाळा अर्जुनी/
मोरगाव क्र. १, जि. गोंदिया ४४१७०१



एके दिवशी मी शाळेत जात होते. तेव्हा रस्त्यावर एक म्हातारी आजी बसली होती. मी तिच्या जवळ गेले व तिच्या जवळ बसले. ती मला म्हणाली, “तुझ्या जवळ काही खायला प्यायला आहे का?” मी म्हणाले आहे. मी तिला माझा डबा व पाण्याची बाटली दिली. मी तिला माझ्या हाताने पोळी व भाजीचा घास भरवला. तिने मला खूप आशीर्वाद दिले व माझे कौतुक केले.

**अनुष्का संदीप पानसरे,**
जि.प.प्रा. शाळा, पुरी, ता. चांदवड, जि. नाशिक ४२३१०१

## उमलती प्रतिभा

## आईची माया



आई होती स्वयंपाक घरात
पुसत होती घाम
दमली ती किती!
वाटले मला करावी
मदत तिला थोडी
गेले मी वाट काढायला
भूक खूप लागली
चूकून हात लागला
कप-बशीच्या कपाटाला
फुटल्या एक दोन बश्या
वाटले आई आता रागावणार
आई आली धावत
उचलून घेतले पटकन
घेतले मुके माझे
पुसले ओलावलेले डोळे
पदराने तिने...

गौरी गोपाल गावंडे
जि.प.प्रा.शाळा खंडाळा,
ता. तेल्हारा, जि. अकोला

## शेतकरी

*वडील माझा शेतकरी,*
*करतो इमाने चाकरी*
*कष्ट करतो दिवसभर,*
*पिकवतो कष्टाची भाकरी*
*वडील माझा थोर,*
*मला जन्म दिला किती मानू*
*त्याचे आभार*
*घाम गाळतो शेतावरी,*
*जपतो त्याला लेकरापरी*

प्राची घनश्याम बावनकुळे
जि.प.वरि.प्रा.शाळा पळसगाव,
जि.प.गोंदिया ४४१८०७

## खेळ माझा छंद

खेळ खेळणे माझा छंद,
खेळताना मिळतो मला आनंद,
खेळताना नसतो मला कोणताही गंध

खेळामध्ये विलीन होतो,
मी खेळातच रमून जातो,
सुट्टीच्या दिवशी दिवसभर खेळ
खेळतच राहतो

क्रिकेट माझा आवडता खेळ,
खेळामध्ये मित्रांचा मेळ,
खेळाचे नियोजन करताना जातो
आमचा खूप सारा वेळ

आदित्य सचिन लोहार
इ.७ वी, तु.ड, द्रविड हायस्कूल, वाई



**साक्षी दत्तू माळी**
इ. ७ वी, जि.प. प्रा शाळा पुरी, ता चांदवड जि. नाशिक



**शिवार्थ दारव्हेकर**
वर्ग ७ वा, जिल्हा परिषद प्रशाला, ता. कळमनुरी जि. हिंगोली



**तेजल जालिंदर वाघचौरे**
जि.प.प्रा.शाळा सात्रळ, इ. ४थी, सोनगाव, ता.राहुरी, जि.अहमदनगर



**इक्रा फरिन शेख**
जि.प.प्रा.शाळा, नेवासा बु.,
ता. नेवासा, जि.अहमदनगर




**अन्विता किशोर दसोरे**
पातुर्डा जि. बुलढाणा ४४४२०१
संत गजानन महाराज ज्ञानपीठ शेगाव. (ज्यु. के.जी.)


पाठलाग
घनश्याम देशमुख
संपर्क ९८२३४१३६२९
खूप जड आहे हे पोतं... काय करू?
थांब रे! रामसिंग येईलच आपल्याला शोधत.
आपण ज्याचा पाठलाग करत होतो त्याचे नाव रामसिंग असावे...
त्याने या दोघांना कशाला बोलावलंय या जंगलात? कोण आहेत हे?
दगडू जाऊ दे रे, चल घरी. आपल्याला काय करायचंय? येईल तुझी गाय परत घरी.
नको माझी गाय त्या रामसिंगच्या जवळच आहे. मघाशी तो फोनवर बोलत होता गाईबद्दल... पण तो रामसिंग गेला कुठं?
मूर्खांनो!
तो बघ! रामसिंग इकडेच येतोय...


रामसिंग, अरे कुठे होतास तू... आम्ही...
गप्प बसा इथे आल्यावर फोन करायचा ना मूर्खांनो!
नेटवर्क नाही मग काय करू
आता चला लवकर येथून माझ्या मागे या.
रामसिंग या दोघांना कुठे घेऊन जाणारा आहे हे बघायला हवं...
आता कुठं जायचं? हे सामान खूप जड आहे. तो दमला आहे.
येथून जवळच ती झोपडी आहे. तिथे तो आणि बाजीराव आहेत .
तो आणि बाजीराव! आणखी दोघे.
म्हणजे एकूण पाच जण. चल त्यांचा पाठलाग करू.
क्रमशः

# लंडनवारी

■ मुबारक शेख

बेडूक म्हणाला, "कासवदादा
जायचं का रे लंडनला यंदा?"
'आपण दोघे जाणार कसे?
नेहमीच आपले रिकामे खिसे!'
"अशा वेळी धरायची हिंमत
कानात सांगतो ऐक गंमत
इथे इतक्यात जहाज येईल
आपली आयती सोय होईल

जहाजावर गुपचूप चढून बसू
फसकन आलं, की दाबायचं हसू
उपाशी पोटी जाऊन यायचं
वाटल्यास खारं पाणी प्यायचं
सातासमुद्राची होईल फेरी
फुकटात घडेल लंडनवारी
परत आल्यावर गंमत बघ
सत्कार करील सगळं जग"

संपर्क : ९६६५२५७१९१



# इंग्रजी विभाग

I am wearing my Papa's shoes
They are really very loose

I walk in them so slowly
It takes a lot of time really


Black & shiny shoes with laces
In them, I feel like I can cross fences

I walk my way to the door
It's getting tough more and more

'slam slam' the shoes sound
Suddenly I fall and I am on the ground

'Hahahahahahaha' laughs my sister
On my feet, I see a blister!

**Dr. Rasika Thosar**
Contact : 9970273841





# The sky is clear now

Varsha Dhoke

"Prachi, did you decorate the wall with balloons?" Mom asked Prachi from the kitchen.

"Yes mom, The decoration is over. My friends have also arrived. Only Aadil and Payal have not come yet, so we are waiting." Prachi informed mom.

Prachi turned twelve years old this year. It was her birthday today. Gargi, Samar and Kabir came early to help Prachi with the decoration. Soumya also joined after. It was five o'clock now. Birthday preparations were almost over. The cake was ready. But Aadil and Payal had not joined yet. They lived next to each other in the worker's society. Thinking that both will join together shortly, the children waited for them.

Prachi's mother was busy with breakfast preparation. Suddenly she heard a loud noise in the hall.

"Prachi, what happened?" she asked.

Mom came to the hall. She saw Aadil panting, and all kids were gathered around him.

Aadil spoke, gasping for air, "Payal's house is on fire, and there is no one in the society."

All were shocked to hear this news. Kabir quickly fetched water and asked Aadil to drink because he looked scared and sweaty.

Mother heard this and said to everyone, "We have to go to Payal as quickly as possible."

She looked at the birthday girl. Prachi quickly ran to the landline phone, saying, "You all go. I am dialling 101 to call the fire brigade. I will join you in no time."

At the next moment, all the children ran towards Payal's home.

The children saw the smoke in the sky from the square. Running faster, they reached Payal's home. Payal was standing outside and crying.

Her parents and all other young men and women from society would go to work in the cotton factory in the morning and return late. Payal's parents were also working at the same time. They got the message about the fire but needed help to reach home. The factory was two kilometres away from the society.

The fire started spreading in the kitchen. Some people from the nearby area gathered and were watching from a distance. Some of them were giving instructions. Few were searching for water from neighbours to throw at the burning house. A brave man from the crowd covered his face with a wet scarf and crawled into the hall slowly. All the people held their breath for a moment. The man switched off the main switch at the location informed by Payal. He came back the same as he went in. After calling the fire brigade, Prachi also reached there. Her mother was holding Payal and trying to calm her down.

Payal was scared, but at this time, it was more important to control the fire from spreading. Prachi and friends started bringing water in the pots and whatever else they could get. Aadil was bringing water from the tank of his house. The men started throwing water on the fire from a distance.

At the same time, the fire brigade vehicle came with its famous loud siren ringing loud.

As firemen reached, they started their work in full swing.

Payal's parents also reached. They rushed to hug their daughter after seeing her safe. Her mother was continuously crying.

After all efforts, the fire was extinguished before spreading to the whole house. Things and utensils from the kitchen were burnt.


When a fireman learned that Prachi was the first to inform the fire brigade, he called her and patted her back. Everyone was very appreciative of the awareness and responsibility shown by Prachi and all her friends. The fire was extinguished, and the black smoke vanished. The sky was clear now.

**Contact : 9850731984**


# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Fill in the blanks of each crossword puzzle to make the addition equation true.**




**There are five differences between these two pictures. Can you spot them?**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मे २०२३.

३) कोड्याचे उत्तर जून २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.04.2023 Posting on 27th & 28th April 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53







कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा

**लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकाच्या चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड**



किंमत प्रत्येकी ₹१६३/- (30% सूट)







किशोर

वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ १६००/-

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,